बा-वा
४१

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
क्र. ४१

# भारताचे कंठमणी

## भाग ३रा

BVBK-0400041

कि.
बा. बी.
नों. क्र. ४१

म. ग्रं. सं. को. [illegible] शाखा.
[illegible]
क्र. ....४१.... नि[illegible] ....
विषय ·किशोर क्र. २०..

BVBK-0400041

४१
किशोर 20

# भारताचे कंठमणी

# [३]

पं. महादेवशास्त्री जोशी

मूल्य पाच रुपये

जोशी ब्रदर्स, पुणे २

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. जनतेचे सरदार | .... | १ |
| २. हलाहल प्राशन | .... | १० |
| ३. लेखी हमी देणार नाही | .... | २० |
| ४. गुरुर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः | .... | २४ |
| ५. दोन तेजस्वी पत्रे | .... | ३० |
| ६. भगीरथाचा वारस | .... | ३८ |
| ७. बिनमठाचा संन्यासी | .... | ४४ |
| ८. गोवास्वातंत्र्याचा दीपस्तंभ | .... | ५२ |
| ९. संपूर्ण क्रांतीचा उद्गार | .... | ५९ |



प्रकाशक : केशव वामन जोशी, २५ बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे २

मु द्र क : शशिकान्त महादेव देव, सुलभ मुद्रणालय, २९१ शनिवार, पुणे ३०

# प्रोचना

आपला भारत हा एक महान् देश आहे. भौगोलिक विस्ताराने मोठा, तसाच परंपरेनेही मोठा. या देशात असंख्य महापुरुष होऊन गेले. आजही हयात आहेत. या थोरामोठ्यांची तितकीच मोठी चरित्रेही लिहिली गेली आहेत. कोणावर नाटके झाली आहेत, तर कोणावर कादंबऱ्या झाल्या आहेत.

पूर्वजांची चरित्रे ही सर्वांत आवश्यक अशी वाचनीय वस्तू. या वाचनाने कोणाला स्फूर्ती मिळते, कोणाचे आदर्श ठरतात, तर कोणाला मार्गदर्शन होते. महापुरुषांची चरित्रे हा भारतीयांचे भारतीयत्व दृढ करण्याचा एक हमखास मार्ग आहे. रामायणात राम तर आहेच; पण रावणही आहे. मग आपण रामायण कशासाठी वाचायचे? रामासारखे वागावे, ते जीवन समृद्ध आणि पुनीत करणारे आहे; अन् रावणासारखे वागता कामा नये, कारण त्यात शेवटी विनाश आहे, सर्वनाश आहे, हे मनावर ठसविण्यासाठी. ते मुद्दाम ठसवावे लागतच नाही. मार्गदर्शन ते हे!

पण महापुरुषांचे हे मोठमोठे चरित्र-ग्रंथ पाहताक्षणीच कुमारवयातल्या मुलांची छाती दडपते. 'अरे बाप रे! एवढं मोठं चरित्र कसं वाचून व्हायचं? राहू दे ते.' अशी भावना कुमार-कुमारिकांच्या मनात उत्पन्न होणे साहजिक आहे.


त्यासाठी मी हा एक नवा मध्यम मार्ग शोधला आहे. यालाच म्हणतात प्ररोचना. एखाद्या मोठ्या व्यक्तीच्या जीवनचरित्रात एक-दोन प्रसंग असे असतात, की ते वाचताच त्या विभूतीचा एकंदर स्वभावधर्म एकदम उजळून निघतो. तो प्रसंग कुमारांच्या मनावर इष्ट तो परिणाम किंवा शुभसंस्कार करू शकतो. त्यातून पुढे समग्र चरित्र वाचण्याची प्रवृत्ती होणेही शक्य असते.

रामायण—महाभारतातल्या गोष्टी सांगून जिजामातेने शिवाजीमहाराजांच्या बालमनावर माणुसकीचे अन् क्षात्रधर्माचे संस्कार केले असे आपण ऐकतो, अन् ती गोष्ट खरी मानतो.

प्रस्तुत पुस्तकांचा हेतूही तोच आहे. हा हेतू माझे मित्र आणि प्रकाशक श्री. केशवराव जोशी यांनाही योग्य वाटला आणि त्यांनी मनावर घेतल्यामुळे ही पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडत आहेत. विद्यार्थीवर्गाला ही पुस्तके प्रिय होतील अशी आकांक्षा आहे.

पुणे
शके १९००

**महादेवशास्त्री जोशी**



## जनतेचे सरदार

श्री. वल्लभभाई पटेल यांच्या नावामागे 'सरदार' ही पदवी आवर्जून लावली जाते. सरदार म्हणजे सेनापती. ही पदवी त्यांना सरकारने दिलेली नव्हती. कोणत्याही महासंस्थेनेही दिलेली नव्हती. ती गुजरातमधल्या जनतेने उत्स्फूर्तपणे एका जाहीर सभेत त्यांना दिली आणि ती त्यांच्या नावामागे कायमची शोभिवंत झाली. ही पदवी त्यांना फुकाची मिळाली नाही. ती मिळण्याच्या आधी त्यांनी गुजरातमधल्या गरीब शेतकऱ्यांचे जीवन-मरणाचे दोन लढे सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या बळावर यशस्वी केले होते. वल्लभभाई म्हणजे भारताचे पोलादी पुरुष असल्याचे त्या दोन लढ्यांनी ढळढळीतपणे निदर्शनाला आले होते. त्या दोन लढयांतला सरदारांचा पोलादी निर्धार पाहून म. गांधीही प्रभावित झाले होते. बोरसद येथील शेतकऱ्यांचा सत्याग्रह संग्राम यशस्वी केल्यानंतर काही दिवसांनी वल्लभभाई जेव्हा पुण्याला महात्माजींना भेटायला गेले, तेव्हा गांधीजी कौतुकभरल्या शब्दांनी सरदारांना म्हणाले,

प्रस्तुत पुस्तकांचा हेतूही तोच आहे. हा हेतू माझे मित्र आणि प्रकाशक श्री. केशवराव जोशी यांनाही योग्य वाटला आणि त्यांनी मनावर घेतल्यामुळे ही पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडत आहेत. विद्यार्थीवर्गाला ही पुस्तके प्रिय होतील अशी आकांक्षा आहे.

पुणे
शके १९००

महादेवशास्त्री जोशी



# जनतेचे सरदार

श्री. वल्लभभाई पटेल यांच्या नावामागे 'सरदार' ही पदवी आवर्जून लावली जाते. सरदार म्हणजे सेनापती. ही पदवी त्यांना सरकारने दिलेली नव्हती. कोणत्याही महासंस्थेनेही दिलेली नव्हती. ती गुजरातमधल्या जनतेने उत्स्फूर्तपणे एका जाहीर सभेत त्यांना दिली आणि ती त्यांच्या नावामागे कायमची शोभिवंत झाली. ही पदवी त्यांना फुकाची मिळाली नाही. ती मिळण्याच्या आधी त्यांनी गुजरातमधल्या गरीब शेतकऱ्यांचे जीवन-मरणाचे दोन लढे सत्याग्रही तत्त्वज्ञानाच्या बळावर यशस्वी केले होते. वल्लभभाई म्हणजे भारताचे पोलादी पुरुष असल्याचे त्या दोन लढ्यांनी ढळढळीतपणे निदर्शनाला आले होते. त्या दोन लढ्यांतला सरदारांचा पोलादी निर्धार पाहून म. गांधीही प्रभावित झाले होते. बोरसद येथील शेतकऱ्यांचा सत्याग्रह संग्राम यशस्वी केल्यानंतर काही दिवसांनी वल्लभभाई जेव्हा पुण्याला महात्माजींना भेटायला गेले, तेव्हा गांधीजी कौतुकभरल्या शब्दांनी सरदारांना म्हणाले,

"या, या ! बोरसदचे बादशहा, या !"

आणि यामागच्या दोन लढायांच्या विजयामुळेच बार्डोलीच्या सत्याग्रह संग्रामाचे पुढारीपण त्यांच्याकडे चालून आले होते. तीच कथा मला यापुढे सांगायची आहे—

ते १९२८ साल होते. बार्डोली हा गुजरातमधला एक तालुका. त्याच्यावर ब्रिटिश सरकारचे एक असमानी संकट कोसळले. हे संकट शेतसारावाढीचे होते.

सरकार दर तीस वर्षांनी शेतसाऱ्याची फेरपहाणी करायचे. तशी ती बार्डोली तालुक्याची झाली. त्या पाहणीत सरकारला वाटले, की बार्डोलीचा शेतसारा वाढवला पाहिजे. सरकारने तो वाढवला. किती ? शेकडा तीस टक्के. म्हणजे बार्डोलीचे शेतकरी वर्षाला एकूण पाच लाख रुपये एवढा शेतसारा भरीत. तोच त्यांना डोईजड होता. तो भरताना कित्येक शेतकऱ्यांना पुष्कळदा घरातली काही चीजवस्त विकावी लागे. आता तर पाच लाखांच्या ऐवजी सुमारे सात लाख रुपयांचा भरणा करावा लागणार होता. शेतकरी त्यामुळे चेपणार होता, भुईसपाट होणार होता.

हा जादा बोजा शेतकऱ्यांवर पडू नये म्हणून गुजरातमधल्या पुढाऱ्यांनी सरकारकडे खूप रदबदल्या केल्या. पण त्या साऱ्या निष्फळ ठरल्या. पाच फेब्रुवारी ही साऱ्याचा पहिला हप्ता भरण्याची तारीख ठरली. संकट जवळ आले आणि ते टाळू म्हणता टळत नाही, असे कळताच बार्डोलीचे प्रमुख शेतकरी वल्लभभाईंच्याकडे धावत आले. त्यांनी सारी हकीगत वल्लभभाईंच्या कानी घातली. सरदार त्यांना म्हणाले,

" तुम्ही आपापल्या गावी जा. शेतकऱ्यांना एकत्र करा. ते लढा द्यायला कितपत तयार आहेत, त्याची चाचपणी घ्या. एकदा लढा सुरू केल्यावर मग विजय मिळेतो माघार घेता कामा नये, पडतील त्या हाल-अपेष्टा भोगल्या पाहिजेत, असं त्यांना सांगा. शेतकऱ्यांची एवढी तयारी

असली तर मी तुमच्या लढ्याचे नेतृत्व करीन."

जे आले होते ते परत गेले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे केले. एवी तेवी मरायचे तर मग लढून मरू, असा त्यांना शेतकऱ्यांचा निर्धार दिसला. त्यांनी तसे सरदारांना कळवले.

वल्लभभाईंनी ही सारी घटना महात्मा गांधींना कळवली. गांधीजींचा संदेश आला. 'पुढे चला ! तुमची फत्ते होणारच !'

मग वल्लभभाईंनी लढ्याची सूत्रे हाती घेतली. त्यासाठी व्यवस्थित योजना आखली. ते चार फेब्रुवारी रोजी बार्डोलीत येऊन दाखल झाले. त्याच दिवशी बार्डोलीत त्यांनी शेतकऱ्यांची परिषद बोलावली. चहूबाजूंनी शेतकरी आले. जथ्याजथ्यांनी आले. काळजात उत्साह भरून घेऊन आले. 'जिंकू किंवा मरू' या अभिनिवेशाने आले. थोडे थोडके नव्हेत; तर तालुक्यातल्या ऐंशी खेड्यांतले शेतकरी तिथे गोळा झाले.

वल्लभभाईंनी त्या सर्वांच्या पुढे एखाद्या सेनापतीप्रमाणे उभे राहून भाषण केले. भावी संग्रामाची त्यांना पूर्ण कल्पना दिली. आवश्यक ते नीतिधैर्य त्यांच्या हृदयात ओतले. 'सरकारला कोणीही वाढीव सारा द्यायचा नाही.' असे त्यांनी निक्षून बजावले. सर्वांचा एकमुखी उद्‌घोष दुमदुमला. 'नाही देणार ! नाही देणार !'

वल्लभभाई एवढे करून अहमदाबादेला आले. सरकारला योग्य ती सूचना आधी देऊन मग लढ्याला प्रारंभ करणे, हे सत्याग्रही संग्रमाचे खुल्लम खुल्ला तत्त्व. त्यात लपवाछपवी नाही. आडून वार नाही. तदनुसार त्यांनी गव्हर्नरला एक विनंतीपत्र पाठवले.

"सारावाढीचा फेरविचार करा. गरिबांना त्रास देऊ नका. आणि फेरविचार होईतो सारा वसूल करू नका......."

पत्राची भाषा सौम्य होती. पण तिच्या आत वल्लभभाईंचा वज्रनिर्धार दडलेला होता. सरकार आपल्याच तोऱ्यात होते. त्याला तो अंतर्गत वन्ही

जाणवला नाही. त्या पत्राला गव्हर्नरचे त्रोटक अन् तुसडे उत्तर आले.

" तुमचे पत्र रेव्हेन्यू खात्याकडे धाडले आहे."

हा टोलवाटोलवीचा प्रकार आहे अन् सरकार वडगा दाखवल्याशिवाय वधणार नाही हे वल्लभभाईंनी मागच्या अनुभवांवरून जाणले.

ते पुन्हा बार्डोलीला आले. पुन्हा त्यांनी शेतकऱ्यांना एकत्र केले. ते म्हणाले,

" मित्रहो ! ' शुरू हुआ है जंग हमारा ! ' आता माघार घेणे नाही. आता माघार घ्याल तर शंभर वर्षं मागे जाल ! पुन्हा तुम्हांला डोकं वर काढता येणार नाही. आपला लढा खात्रीने यशस्वी होईल. फक्त तुमची एकजूट अभेद्य पाहिजे. तुमची ताकद तुमच्या मुठीत नाही. ती आहे तुमच्या हृदयात. सरकार सशस्त्र आहे. सर्व बाजूंनी समर्थ आहे. आपल्या हाती फक्त एकच शस्त्र आहे, सत्याग्रह ! प्रसंगी सर्वस्वाचा होम झाला तरी पण सत्याग्रह !."

सर्वांनी या जीवनमरणाच्या लढ्याला उत्स्फूर्त संमती दिली. त्या शेतकरीसमुदायात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, सर्व धर्मांचे अन् जातींचे लोक होते. पण सर्वांचा एकच आवाज उमटला. ' हम लढेंगे, नहीं डरेंगे ! '

आणि त्या क्षणापासून लढ्याला तोंड लागले. वल्लभभाईंच्या पत्राला सरकारकडून उद्दामपणाचे उत्तर आले.

" तुम्ही काही बार्डोलीचे रहिवासी नाही. तुम्ही बार्डोलीत उपऱ्ये आहा. बार्डोली तालुक्याची भरभराट होत आहे. तेव्हा त्यासाठी शेतकऱ्यांनी वाढीव सारा भरलाच पाहिजे. सरकारचा निश्चय कायम आहे. सरकार फेरविचार करणार नाही. सारावसुली थांबवणार नाही. सूटही देणार नाही. जे कोणी शेतकरी सरकारच्या निर्णयाविरुद्ध वागतील, त्यांना सरकार कडक शिक्षा करील ! "

सरकारचे हे आव्हान वल्लभभाईंनी स्वीकारले. त्यांनी लगेच एक जाहीर

सभा घेतली. ते सिंहासारखे गर्जून उठले.

"गुजराती जनतेत वन्ही प्रज्वलित झाला आहे. तो आता विजय मिळाल्यावाचून शमणार नाही. गुजरातचा शेतकरी शरीराने दुबळा असेल; पण त्याची छाती सिंहाची आहे. त्याला जीवन जगायचं आहे; पण ते कुत्र्यामांजराचे नव्हे. तो स्वाभिमानासाठी आज मरायलाही तयार झाला आहे."

चळवळीचा असा वणवा पेटवीत, पेटवीत सरदार तालुकाभर हिंडत होते. त्यांनी लोकांनी ज्या सूचना दिल्या, त्या त्यांना सत्याग्रहाचे शस्त्र अन् शास्त्र पुरते अवगत झाले होते याची साक्ष देणाऱ्या होत्या—

"माझ्याशिवाय कोणीही सभा भरवून जाहीर भाषण करू नये. सरकार जप्तीचे सत्र सुरू करील. त्या प्रसंगी तिथे कोणीही हजर राहू नये. सरकारी वेठबिगार देऊ नये. ज्या कोणाला सारा भरायचा असेल पण लोकांच्या भीतीमुळे तसं करणे कठिण होत असेल, त्याने माझ्याकडे यावं. मी त्याला मामलेदाराकडे घेऊन जाईन. अशा शेतकऱ्याला कोणी मारपीट करायला आल्यास त्या लोकांचे दंडुके माझ्या अंगावर घेईन."

शेतकऱ्यांचे मनोधैर्य अभंग राहावे आणि चळवळीला हिंसक वळण लागू नये यासाठी वल्लभभाई जिवाचे रान करीत होते. त्यांना ठाऊक होते की सरकार हिंसाचाराची वाट पाहात आहे. जरा कुठे दगडफेक झाली, जरा कोणी सरकारी नोकरवर्गावर हात उचलला तर तेवढे निमित्त करून सरकार गोळीबार करायलाही कचरणार नाही. तसे झाले असते तर चळवळ उद्ध्वस्त झाली असती. यश मोडून पडले असते. अहिंसा हे चळवळीचे मोठेच पथ्य होते. म्हणून ते प्रत्येक सभेत शेतकऱ्यांना तसे निक्षून सांगत —

"मित्रहो! सध्या सरकार फार गरम झाले आहे. होऊ द्या. आपण मात्र थंड राहिले पाहिजे. लोखंड कितीही तापून गरम झाले तरी त्यावर

मारायचा घण हा थंडच असला पाहिजे. घण गरम झाला तर तो मारणाऱ्याचा हातच जळून जाईल. तेव्हा तुम्ही तुमचे डोके शांत ठेवा. संयम सोडू नका."

सरकारचे दमनचक्र सुरू झाले. त्याला ताळतंत्रच उरला नाही. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी लिलावाला काढल्या. शेतकरी जीव गमावील, पण जमीन जाऊ देणार नाही, हे सरकारला ठाऊक होते. पण लिलावात काढलेल्या जमिनी विकत घ्यायला कोणीही हरीचा लाल पुढे येईना. सरकार त्यामुळे अधिक चिथरले. त्याने शेतकऱ्यांची भांडीकुंडी, चीजवस्तू बाहेर काढली. गोठ्यातल्या गायीम्हशी बार्डोलीच्या बाहेर नेऊन खाटकांना विकल्या. तेवढ्यानेही शेतकरी बधेनात म्हणून मुंबईहून पठाण मागवले. निरपराध लोकांच्या पाठीवर त्यांचे दंडुके बसू लागले. तरीही बार्डोलीचा शेतकरी डगमगला नाही.

सरकारने मग धरपकडीचे सत्र आरंभले. शेतकऱ्याने सारा देत नाही म्हटले की, त्याला उचलायचे अन् तुरुंगात ढकलायचे. त्या धरपकडीला काही सुमारच उरला नाही. या दमनचकामुळे सत्याग्रहाचे दुसरे पर्व सुरू झाले. चहूबाजूंनी सत्याग्रहींचे जथे बार्डोलीला येऊ लागले. या सत्याग्रही सैनिकांत पुरुष प्रामुख्याने असले तरी बायकाही कमी नव्हत्या. मुलेही मागे राहिली नव्हती. सर्वांचा नारा एकच! 'नही देंगे, नही देंगे!'

सरकारच्या या अघोरी दडपशाहीला आणखी एका अभिनव प्रकाराने उत्तर द्यायचे शेतकऱ्यांनी स्वयंस्फूर्तपणे ठरविले. सरकारी अधिकारी अन् पोलिस शिपाई यांच्यावर बहिष्कार घालायचा. कल्पना निघाली अन् ती लगोलग अंमलातही आली.

सरकारचे लोक दुकानात गेले, तर त्यांना धान्य मिळेना. गरजेची एकही वस्तू मिळेना. दुकानदार नन्नाचा पाढा वाचू लागले. त्यांना दुधाचा थेंबही मिळेना. भाजीपालाही मिळेना. न्हावी त्यांची हजामत करीना.

कोणी त्यांना वाहन देईना. इतकेच नव्हे, तर त्या अधिकाऱ्यांना तहान लागली तर कोणाच्या झोपडीत लोटाभर पाणीही मिळेना. अधिकारी अन् शिपाई त्यामुळे घायकुतीला आले.

ही वार्ता वल्लभभाईंना समजली. त्यांनी लगेच शेतकऱ्यांची सभा घेतली. ते म्हणाले,

" शेतकरी बंधूंनो ! सरकारी लोकांवर तुम्ही असा बहिष्कार घालू नका. त्यांची कोंडी करू नका. हे आपल्या सत्याग्रहाच्या शास्त्रात बसत नाही. सरकारी लोकही आपलेच आहेत. ते आपले भाईबंदच आहेत. गोरा साहेब झाला तरी तोही माणूसच आहे. या सर्वांना गरजेच्या वस्तू मिळाल्या पाहिजेत. अधिकाऱ्यांनी माणुसकी पायदळी तुडवली, तुमच्या घरादारांवरून नांगर फिरवायचं ठरविलं तरी आपण माणुसकीने वागू या."

सरकारी लोकांवरचा बहिष्कार लगोलग उठला. पण त्यांचे तुरुंगभरतीचे, मारपिटीचे ' सत्कृत्य ' चालूच राहिले. त्यामुळे गावेच्या गावे तापली. बहुतेक पाटलांनी आपल्या पाटिलकीचे राजीनामे दिले. बरेच तलाठीही राजीनामे देऊन मोकळे झाले. जवळजवळ ऐंशी हजार माणसे सरकारच्या रोषाला बळी पडली.

आता बार्डोलीचा हा सत्याग्रह हा केवळ बार्डोलीचा राहिला नाही. केवळ गुजरातचाही राहिला नाही. आता त्याला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले. १२ जून १९२८ हा दिवस सर्व राष्ट्राने बार्डोली दिन म्हणून पाळला. मुंबई, अहमदाबाद इत्यादी शहरांत सत्याग्रही शेतकऱ्यांच्या मदतीसाठी हजारो रुपयांचा निधी जमला. बार्डोलीच्या सत्याग्रहाश्रमावर चहूबाजूंनी पैशांचा पाऊस पडू लागला. लोकमत तयार होऊ लागले.

पं. मोतीलाल नेहरू, सप्रू, मुन्शी वगैरे विचारवंत धुरीणांनी सरकारच्या मागे लकडा लावला. ' सारावाढीची अन् सारावसुलीतील जुलमांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र आयोग नेमा. सारावाढ योग्य की अयोग्य हे

जाणकारांच्या दृष्टीतून ठरवा. मुख्य अट म्हणजे बार्डोलीच्या शेतकऱ्यांवरचे अत्याचार थांबवा— ”

असे राष्ट्रभर चहूबाजूंनी जेव्हा रान उठले, आणि कितीही जुलूमजबर-दस्ती केली तरी बार्डोलीचा शेतकरी नमत नाही, अशी जेव्हा खात्री पटली, तेव्हा कुठे सरकारचे डोके ठिकाणावर आले. सरकारने फतवा काढला : ‘ आम्ही चौकशी आयोग नेमू. जुनाच सारा स्वीकारू. लोकांनी आपली चळवळ थांबवावी.’

आणि लगेच जादूची कांडी फिरली. सर्वत्र विजयाचा आनंद पसरला. शेतकऱ्यांना कृतकृत्य वाटले. पाटील, तलाठी कामावर रुजू झाले. लिलावात गेलेल्या शेतजमिनी ज्याच्या त्याला परत मिळाल्या. निर्धन, निःशस्त्र अन् निरक्षर शेतकऱ्यांनी केवळ सत्याच्या अन् आत्मिक बळाच्या साम-र्थ्यावर एका बलाढ्य साम्राज्याला नमवले. त्याला दाती तृण धरायला लावले. सरदारांचे नेतृत्व वाघनखशी ठरले. झळाळू लागले. गावोगावी जाहीर सभांतून सरदारांच्यावर मानपत्रांची अन् स्तुतिसुमनांची वृष्टी होऊ लागली.

पण सरदार संयमी होते. ते गर्वाने फुगले नाहीत. या नेत्रदीपक विजयाने कोणालाही खरे अस्मान ठेंगणे वाटू लागायचे. पण सरदार नम्र झाले, अधिक विनयशील झाले. एका मानपत्राला उत्तर देताना ते म्हणाले,

“ मी गांधींचा पट्टशिष्य आहे, असे तुम्ही म्हणता. पण तेवढी माझी योग्यता नाही. ती प्राप्त करून घेण्यासाठी मला अनेक जन्म घ्यावे लागतील. या लढ्याच्या यशाचे श्रेय गांधीजींना आहे. शेतकऱ्याला संजीवनी देणारे ते. ती संजीवनी त्यांनी माझ्या हस्ते बार्डोलीच्या शेतकऱ्यांपर्यंत पोचवली.”

*   *   *

स्वतंत्र, सार्वभौम भारताचे सरदार हे पहिले गृहमंत्री. त्या पदाची सूत्रे हाती घेतल्यावर थोड्याच काळात त्यांच्या पुढे एक महान कामगिरी वाढून

आली. लहानमोठी सुमारे सातशे संस्थाने या देशात सर्वत्र विखुरलेली होती. ती आपल्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करू लागली होती. ब्रिटिश सरकारने जाता जाता त्यांना सार्वभौम अधिकार देऊन टाकले होते. ही सारी संस्थाने स्वतंत्र राहिल्यास ती चहू अंगी देश पोखरू शकणार होती. तसे वारे त्या संस्थानिकांच्या अंगात संचरू लागले होते. कोणी तरी त्यांना समर्थ मांत्रिक भेटायला हवा होता. सरदारांच्या रूपाने त्यांना तो भेटला. सरदारांनी त्या संस्थानिकांवर मंत्र फुंकला.


"आतापर्यंत ब्रिटिश सरकार तुमचे पाठिराखे होते. आता ब्रिटिश गेले. कायमचे गेले. त्यांच्याप्रमाणे आम्ही तुम्हांला संरक्षण देऊ असे समजू नका. तुमची प्रजा प्रजा स्वातंत्र्यासाठी झगडू लागली, तर तिचा बंदोबस्त करण्यासाठी आम्ही मदत करणार नाही. आमचे लष्कर तुमच्या संरक्षणासाठी धावून येणार नाही. आम्हाला सर्वत्र जनतेचं राज्य व्हायला हवं आहे!"

सरदारांचा हा मंत्र ताबडतोब लागू पडला. सर्व संस्थानिक त्या एकाच मंत्राने घायाळ झाले, शरण आले. त्यांनी संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन करायला बिनशर्त संमती दिली. ज्या कोणी थोडा फार आडमुठेपणा केला, त्यांना सरदारांनी बळाचा वापर करून विलीन व्हायला लावले.

आणि या घटनेने भारत खऱ्याखुऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला, एकजीव बनला. सार्वभौम ठरला!

सरदार वल्लभभाई गेले; पण जाण्याच्या आधी असे काही महनीय आणि महदुपकारक कृत्य करून गेले, की त्याची स्मृती चिरंतन राहावी!

❀ ❀



## हलाहलप्राशन

श्री. शंकर सुलतानपुरी या चरित्र लेखकाने डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आणि म. गांधी यांच्या संबंधात एक आठवण नोंदवली आहे. ती अशी—

एके दिवशी गांधीजी आणि श्यामाप्रसाद बातचीत करीत होते. दोघेही वार्तालापात मनमोकळे झाले होते. एवढ्यात एक व्यक्ती तिथे आली. गांधीजींना म्हणाली,

“ बापू ! आपण कोणाशी वार्तालाप करीत आहा याचे भान आहे ना ? अहो, हे गृहस्थ हिंदुमहासभावादी आहेत.”

त्यावर गांधीजी म्हणाले.

“ मला ठाऊक आहे. पं. मालवीय यांच्या पश्चात कोणी तरी हिंदूंचे नेतृत्व करणारा हवा होता. तशी गरजच होती. समुद्रमंथनातून हलाहल विष निर्माण झाले आणि ते प्राशन करून शिवाने सर्वांना शांत केले. त्याचप्रमाणे यापुढे भारताच्या राष्ट्रीय जीवनात जे हलाहल निर्माण

होईल, त्याचे प्राशन करायला कोणाची तरी गरज आहे. ते काम हे गृहस्थ करतील.'

गांधीजी द्रष्टे होते, हेच खरे ! नाहीतर असे हलाहलप्राशनाचे उद्गार त्यांच्या मुखातून निघाले नसते. त्यांची वाणी खरी ठरली !

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी म्हणजे बंगालमधले एक ख्यातनाम पुढारी. सर आशुतोष मुखर्जी हे त्यांचे वडील. आशुतोष म्हणजे बंगालमधील एक फार मोठी आसामी होती. नामांकित वकील आणि कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरू. सर उपाधीने सरकारने त्यांना गौरवले असले तरी त्यांनी त्या बाबतीत सरकारचे मिंधेपण कधीच पत्करले नाही. त्यांच्या स्वाभिमानी, ताठर वृत्तीचा एक किस्सा सांगण्याजोगा आहे—

इंग्लंडमध्ये सातवे एडवर्ड हे बादशहा गादीवर बसणार होते. फार मोठा तो राज्यारोहण समारंभ व्हायचा होता. साम्राज्यांतर्गत सर्व देशांतले मोठमोठे लोक त्या प्रसंगी बादशहाला कुर्निसात करण्यासाठी नजराणे घेऊन तिथे उपस्थित होणार होते. बादशहाच्या साम्राज्यवैभवाची स्तुतिस्तोत्रे गाणार होते.

त्या काळी हिंदुस्थानचे व्हाइसरॉय होते लॉर्ड कर्झन. ' हिंदुस्थानातून नामांकित प्रजाजनांना समारंभासाठी इंग्लंडला पाठवून द्या ' असा त्यांना इंग्लंडातून सांगावा आला होता. तदनुसार त्यांनी सर आशुतोषबाबूंना समारंभाचे निमंत्रण पाठवले.

इतर कोणी असता तर या निमंत्रणाने हुरळून गेला असता. कारण सरकारी खर्चाने त्यांची विलायतयात्रा होणार होती. शिवाय वर मानाचा तुरा. पण आशुतोषबाबूंना तो मान वाटला नाही. ते ब्रिटिश साम्राज्याचे भाट—चारण नव्हते; त्यामुळे त्यांच्या तोंडाला पाणी सुटले नाही. किंबहुना त्यांना तो अपमानच वाटला. हिंदुस्थानच्या जनतेला टाचेखाली चिरड-णाऱ्या बादशहाला कुर्निसात करायला जायचे ? त्याच्या स्तुतिगानात

सामील व्हायचे ? छेः ! आपल्या हातून नाही जमायचे. त्यांनी लगेच व्हाइसरॉयला कळविले.

" निमंत्रणाबद्दल आभार ! पण जायला जमणार नाही."

ते पत्र पाहून व्हाइसरॉयच्या कपाळाला आठ्या पडल्या. बादशहाचे राज्यारोहण, त्यासाठी निमंत्रण, हा केवढा बहुमान ! आणि आशुतोषबाबू चक्क नकार देतात याचा अर्थ काय ? व्हाइसरॉयला तो अपमान वाटणे साहजिकच होते. त्याने आशुतोषबाबूंना बोलावणे धाडले. ते उपस्थित झाले.

" तुम्ही समारंभासाठी इंग्लंडला जात नाही ? "

" नाही महाराज."

" का ? "

" आई जाऊ नको म्हणते."

लॉर्ड कर्झन क्षणभर अवाक झाला. मग म्हणाला,

" तुमच्या आईला सांगा. म्हणावं, हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयची आज्ञा आहे, की तिच्या मुलानं निमंत्रण स्वीकारलंच पाहिजे ! इंग्लंडला गेलंच पाहिजे !"

आशुतोषबाबू तात्काळ उत्तरले,

" माझ्या आईच्या सूचनेवरून मी हिंदुस्थानच्या व्हाइसरॉयला कळवतो, की तिच्या मुलाने तिच्यावाचून दुसऱ्या कोणाची आज्ञा पाळणं तिला आवडणार नाही. मग तो व्हाइसरॉय असो अथवा त्याहून कोणी मोठा असो."

आणि खरोखरच आशुतोषबाबू राज्यारोहणाला गेले नाहीत. डॉ. शामाप्रसाद हे अशा स्वाभिमानी देशभक्ताचे सुपुत्र होते. देशभक्तीचा वारसा त्यांना पित्याकडूनच मिळाला होता. श्यामाप्रसाद कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी विश्वविद्यालयातून बी. ए. झाले आणि विद्यापीठात पहिले आले. पुढे बंगाली भाषा

घेऊन एम्. ए. झाले. नंतर बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला गेले. दोन वर्षांनी ती पदवी घेऊन आणि तिकडे नावलौकिक मिळवून परत आले. पण इथे वकिली मांडली ती स्वतःसाठी नव्हे; तर देशासाठी. त्यांनी हायकोर्टाच्या ऐवजी शिक्षणक्षेत्राच्या दालनात प्रवेश केला आणि त्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. पुढे ते कलकत्ता विद्यापीठाचे कुलगुरूही झाले. १९३८ साली त्या विद्यापीठाने त्यांना डी. लिट् ही उपाधी देऊन गौरविले. आता लोक त्यांना डॉक्टर मुखर्जी म्हणू लागले.

विचार, भावना, धर्म आणि व्यक्तित्व या सर्व दृष्टींनी डॉ. श्यामाप्रसाद हे शंभर टक्के हिंदू होते. बंगालमध्ये काही जिल्ह्यांत मुसलमानांची बहुसंख्या होती. ते मुसलमान नाना कुरापती काढून हिंदूंना छळीत. त्यांच्यावर अनेक प्रकारे अत्याचार करीत. त्यामुळे तिथल्या हिंदूंना धन अ णि जीवित यांपैकी कशाचीच शाश्वती वाटत नसे. त्यांना कोणी वालीच उरला नव्हता. म. गांधी हे देशातले सर्वश्रेष्ठ पुढारी. पण ते हिंदूंना काहीही आश्वासन देत नव्हते. उलट त्यांचे असे सांगणे असे की, हिंदूंचे नुकसान झाले तरी ते सोसून त्यांनी मुस्लिम बांधवांशी मिळून मिसळून राहिले पाहिजे.

डॉ. श्यामाप्रसाद यांना हिंदूंची ती दयनीय व अपमानित अवस्था सहन झाली नाही. तोवर ते काँग्रेसमध्ये होते. पण काँग्रेसचे हे आत्मघातकी धोरण सहन न होऊन त्यांनी काँग्रेसचा त्याग केला. ते हिंदुमहासभेत दाखल झाले. त्यांच्या आगमनामुळे हिंदुमहासभेत जणू नवा प्राण संचारल्या-सारखे झाले.

अशात १९४१ साल उजाडले. श्री. फजलूल हक्क यांनी गव्हर्नरच्या आधिपत्याखाली बंगालमध्ये मंत्रिमंडळ बनवले. त्यात सामील होण्यासाठी त्यांनी डॉ. श्यामाप्रसाद यांना पाचारण केले. त्या वेळी काँग्रेस ही मुस्लिम लीगशी हातमिळवणी करून मंत्रिमंडळ बनवण्याच्या प्रयत्नात होती. फजलूल हक्क हे प्रजाकिसान पार्टीचे पुढारी होते. मुखर्जींनी काँग्रेसला साथ देण्या-

ऐवजी श्री. हक्क यांना साथ देणे अधिक पसंत केले. त्यांच्या मंत्रिमंडळात ते सहभागी झाले. त्यांना अर्थमंत्री हे पद मिळाले.

डॉ. मुखर्जींनी अर्थमंत्रिपद ग्रहण करताच अनेक जटिल समस्या त्यांच्यापुढे उभा राहिल्या. मुख्य म्हणजे १९४२ चे समुद्री तुफान. बंगालमधला मिदनापूर जिल्हा हा समुद्रतटाला लागूनच आहे. त्या जिल्ह्यात हे वादळ उठले. वादळ कसले ! महाकालाचे संहार–तांडवच होते ते ! एका घटकेत त्याने होत्याचे नव्हते करून टाकले. शेकडो घरे बुडाली. गावेच्या गावे बसली. शेकडो लोक प्राणाला मुकले. वादळ आले आणि गेले. मागे उरली ती दीन, दुःखी, हताश जनता ! जी माणसे मेली ती गेली; पण जी जगली त्यांचे दुःख मरणाहूनही तीव्र होते. त्यांचे पुनर्वसन करायला हवे होते. डॉ. मुखर्जी त्या दुःखितांचा करुण आक्रोश ऐकून तिकडे धावले. त्यांनी स्वयंसेवकांची संघटना उभी केली. लोकांना आवाहन करून जमला तेवढा पैसा गोळा केला. पण त्यांच्या या उद्योगाला मंत्रिमंडळाची साथ मिळाली नाही. सरकार खरे; पण ते ब्रिटिश गव्हर्नरच्या हातातले बाहुले होते. त्याचे अधिकार मर्यादितच होते आणि गोऱ्या गव्हर्नरला इथले लोक मेले काय आणि जगले काय, त्याचे सुवेर सुतक नव्हते. तो पीडितांच्या पुनर्वसनासाठी पूर्ण उदासीन होता. सरकारी अधिकारी आपल्या वरच्या इंग्रजी अधिकाऱ्याच्या इशाऱ्यावर बसत होते किंवा उठत होते. पनात आले तरी त्यांना स्वतःच्या इच्छेने काही करता येत नव्हते. डॉ. मुखर्जींच्या हाताखालचे अधिकारीही त्यांचा हुकूम पाळीत नव्हते.

मिदनापूर जिल्ह्यातल्या लोकांवर किंबहुना सगळ्या बंगालवरच गोऱ्या सरकारचा राग होता. कारण ते लोक चळवळ करीत होते. ब्रिटिशांच्या विरुद्ध उठाव करीत हो ते. म. गांधींना आपला पुढारी मानीत होते. त्यांच्या आज्ञा पाळीत होते. आणि यासाठी गोरा गव्हर्नर तिथल्या लोकांवर

खवळून होता. लोक जेव्हा मदतीसाठी हात पसरून त्याच्याकडे गेले तेव्हा त्याने लोकांच्या जखमेवर मीठ चोळले. तो त्यांना अवमानून म्हणाला, 'माझ्याकडे कशाला आलात? चला तुमच्या गांधीकडे आणि मागा त्याच्याकडे भीक!'

डॉ. श्यामाप्रसाद म्हणाले, 'हे कसले मंत्रिमंडळ अन् हे कसले सरकार! हे तर गोऱ्या राजवटीने उभे केलेले एक बुजगावणे आहे. असल्या सरकारात हात बांधून बसण्यापेक्षा मोकळ्या हातांनी बाहेर पडलेलेच बरे!'

त्यांनी लगेच आल्या अर्थमंत्रिपदाचे त्यागपत्र दिले. त्या त्यागपत्रात त्यांनी स्वतःच्या हृदयाला पराणी लागणाऱ्या कित्येक गोष्टी लिहिल्या होत्या आणि शेवटी त्या गोऱ्या गव्हर्नरालाही चार शब्द सुनावले होते.

"परकीयांच्या गुलामगिरीतून आपल्या देशाला मुक्त करणे आणि भारताच्या स्वातंत्र्याचे स्वप्न पाहाणे हा जर अपराध असेल तर या देशातील प्रत्येक स्वाभिमानी व्यक्ती तुमची घोर अपराधी आहे. तुम्ही यापुढे आमच्या डोळ्यांत अधिक धूळ फेकू शकणार नाही!"

१९४२ साल असे उजाडले आणि असे अस्तमले. १९४३ साल त्याहून हृदयद्रावक होते. त्यात प्रथम बंगालमध्ये न भूतो न भविष्यति दुष्काळ पडला. सगळीकडे प्रेतांचेच ढीग. माणसे भूक भूक करीत आणि अन्न अन्न असा टाहो फोडीत, टाचा घासघासून मेली. बंगाल जणू यमराजाची विहारभूमी बनली. याही वेळी सरकारची उदासीनता प्रामुख्याने उठून दिसली. बाजारपेठांतून आणि व्यापाऱ्यांच्या गुदामांतून धान्याच्या हजारो-लाखो पोत्यांच्या थप्प्या लागल्या होत्या. पण त्या गुदामांची दारे बंद होती. सरकारने ती गुदामे फोडून मरत्या लोकांच्या मुखी शेवटचा घासही घातला नाही. डॉ. मुकर्जी मात्र या दुष्काळपीडितांच्या साह्याला धावले. मिळेल तेवढे अन्न मिळेल तिथून त्यांनी गोळा केले. पण तेवढ्याने निभाव लागला नाही. सरकार नुसती त्यांची मजा पाहात होते.

ते वणवण हिंडत होते. रात्रंदिवस कष्ट उपशीत होते. दीन-दुःखितांचे अश्रू पुशीत होते. स्वतःला जेवढे करता येईल, ते साऱ्या शक्ती पणाला लावून करीत होते. पण सरकारने पाषाणाची खोळ घेतली होती, ती त्याला टाकावीशी वाटली नाही.

दुष्काळ संपतो न संपतो तोच पूर्वबंगालमध्ये हिंदु-मुसलमानांचा दंगा उसळला. मुसलमानांच्या 'दीन-दीन' गर्जना आणि हिंदूंचा 'वाचवा वाचवा' असा आक्रोश! हिंदूंची घरे जळाली. उद्योगधंदे 'अग्नये स्वाहा' झाले. रस्त्या-रस्त्यावर, गल्ली-बोळांतून हिंदूंच्या प्रेतांचा खच पडला. असे सारे हत्याकांड! असा सारा हाहाकार! कोण वाचवणार त्यांना? कोण ती दंग्याची आग शमवणार? ज्याच्या काळजात त्या पीडितांचा आक्रोश उमटला असेल तो! आणि अशी व्यक्ती एकच होती आणि ती म्हणजे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी.

डॉ. मुखर्जी ताबडतोब ढाक्याकडे धावले. स्वतःच्या प्राणाची बाजी लावून तिथे पोचले. सरळ तिथल्या नबाबाच्या कोठीवर जाऊन दाखल झाले. त्यांनी तिथे ढाक्यातील मुस्लिम पुढाऱ्यांना एकत्र बोलावले. प्रतिष्ठित हिंदूंनाही बोलावले. उभय जमातींची सभा घेतली. त्या सभेत हृदयस्पर्शी भाषण केले. माणुसकीचा मंत्र उच्चारला. शेजारधर्माचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले—

"या भूमीवर सर्वांना जगण्याचा हक्क आहे. पण हे जगणं गुण्या-गोविंदाचं असलं पाहिजे. हिंदु-मुसलमान एकमेकांचे शत्रू नाहीत. दोघेही या भूमीची लेकरं आहेत. दोघेही भाई-भाई आहेत. आपल्यामध्ये जो कोणी कलह लावतो, फूट पाडतो, एकमेकांना एकमेकांच्या उरावर बसायला लावतो, त्याला आपण ओळखलं पाहिजे. तो आहे इंग्रज. त्याला आपली एकी नको आहे. त्याला आपल्यामध्ये कलहाची आग पेटवून तिच्यावर स्वतःची पोळी भाजून घ्यायची आहे. तरी हिंदूंनो, मुसलमानांनो, सावधान!

आपण एकजूट करू या. एकमेकाना मदत करू या आणि सर्व मिळून स्वतंत्र होऊ या.

डॉ. श्यामाप्रसाद यांचे प्राण पिळवटून निघालेले हे शब्द वाया गेले नाहीत. त्यांचा विलक्षण प्रभाव पडला. ढाक्यातली दंग्याची आग शमवूनच ते कलकत्याला परत आले.

आणि तरीही आश्चर्याची गोष्ट ही की, देशातल्या मान्यवर पुढाऱ्यांनी डॉ. श्यामाप्रसादांना ' संकुचित संप्रदायवादी ' ठरविले.

ते संकुचित नव्हते; पण स्वधर्माचे अभिमानी निश्चित होते. त्यांच्या मनावर आणि विचारांवर स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांचा प्रभाव होता. बंगालमधील मुसलमानांची आक्रमक वृत्ती, हिंदूंचा पदोपदी होणारा अपमान आणि तत्कालिन पुढाऱ्यांची आत्मघातकी भूमिका, या गोष्टींनी संत्रस्त होऊन ते स्वा. वीर सावरकरांकडे ओढले गेले. सावरकरांच्या नंतर तेच हिंदुमहासभेचे अध्यक्ष झाले.

पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिस्थिती पालटली. डॉ. श्यामाप्रसादांच्या विचारांतही परिवर्तन झाले. त्यांनी हिंदुमहासभेचा राजिनामा दिला आणि १९५१ साली लखनौ येथे जनतेचा एक विराट मेळावा भरवून त्यांनी एका नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. भारतीय जनसंघ असे त्याचे नाव ठेवले. या जनसंघाचा उद्देश स्पष्ट करताना ते म्हणाले—

जनसंघ हा एक राजकीय पक्ष आहे. कोणत्याही जातिला किंवा धर्माला विरोध करण्यासाठी त्याचा जन्म झाला नाही. त्याचा उद्देशही नकारात्मक नाही. आपल्या देशाचे ऐक्य आणि स्वातंत्र्य अबाधित आणि अक्षुण्ण राखण्यासाठी अशा पक्षाची गरज निर्माण झाली आहे. जातिभेद, भाषाभेद, धर्मभेद, हे सर्व वाद मिटविण्यासाठी जनसंघ प्रयत्न करणार आहे. या पक्षाचा मुख्य उद्देश मातृभूमीचे रक्षण करणे आणि जनतेत राष्ट्रीयतेचा उदय करणे हा आहे. जगाच्या ओढाताणीत भारताचे संरक्षण होण्यासाठी भारतीय

जनता संघटित आणि बलशाली बनली पाहिजे. त्यासाठी सतत प्रयत्न करणे, हे आमचे काम राहील !

ही झाली देशातली कामगिरी. डॉ. श्यामाप्रसादांच्या विदेशातील कामगिरीचा एक प्रसंगही सांगितलाच पाहिजे.

भारतात बौद्ध धर्माच्या उत्कर्षासाठी महाबोधिसभा नावाची एक संस्था स्थापन झाली होती आणि त्या सभेने डॉ. श्यामाप्रसादांना सभेच्या अध्यक्ष-स्थानावर बसविले होते.

मध्यप्रदेशातील भोपाळजवळचे साँची येथील बौद्ध स्तूप हे जगविख्यात आहेत. त्या स्तूपांत बुद्धाचे पवित्र अवशेष ठेवलेले होते. आपल्या राजवटीत इंग्रजांनी ते खणून काढले व इंग्लंडला पाठवून दिले. जसा काही त्यांच्या बापजाद्यांचा माल ! पण त्यांना कोण अटक करणार ? कारण ते सर्वतंत्र-स्वतंत्र होते. पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने ते अवशेष परत मिळावे अशी मागणी केली आणि मग इंग्रजांनी ते भारताच्या स्वाधीन केले. त्या पवित्र अवशेषांच्या स्वागतासाठी कलकत्त्यात एक विशाल समारोह आयोजित करण्यात आला. त्या समारोहात भारताचे पंतप्रधान या नात्याने पं. नेहरूंनी ते अवशेष महाबोधिसभेचे अध्यक्ष म्हणून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या स्वाधीन केले.

बौद्ध धर्माचे अनुयायी या अवशेषांच्या दर्शनासाठी उत्कंठित होते. या देशातलेच नव्हे, तर अन्य देशांतील सुद्धा ! त्यासाठी डॉ. मुकर्जी यांना पूर्व आणि आग्नेय देशांच्या राज्यांतून वारंवार निमंत्रणे येऊ लागली. या निमंत्रणांना मान देण्यासाठी पहिल्या प्रथम १९५२ साली ते पवित्र अवशेष घेऊन डॉ. श्यामाप्रसाद ब्रह्मदेशाला रवाना झाले.

त्या कालात ब्रह्मदेशाची हालत ठीक नव्हती. तिथे अंतर्गत यादवी धुमसत होती. ब्रह्मदेश अशांत होता. पण डॉ. श्यामाप्रसाद तिथे गेले आणि तिथले लोक अंतर्गत कलह विसरले. सर्वांनी एकदिलाने, एकमुखाने

त्यांचे हार्दिक स्वागत केले. त्या पवित्र अवशेषांचे दर्शन घेऊन ब्रह्मी बौद्ध धन्य झाले. त्यांच्या या आगमनाविषयी ब्रह्मदेशाचे तत्कालीन पंतप्रधान थाकिन नू हे लिहितात :

" डॉ. श्यामाप्रसाद यांनी रंगूनला येऊन या देशाची महनीय सेवा केली आहे. त्यांच्या आगमनामुळे आमच्या देशात विलक्षण परिवर्तन घडून आले आहे. इथले लोक श्यामाप्रसादांना आपला आत्मा मानतात ! "

पण दुर्दैवाची गोष्ट अशी, की या महान मानवतेच्या सेवकाचा काश्मीमधल्या तुरुंगात अंत झाला. तिथल्या जनतेची, विशेषतः हिंदुबांधवांची श्री. शेख अब्दुल्ला यांच्या राजवटीत कशी काय अवस्था आहे, हे पाहण्यासाठी सरकारी नियम मोडून ते काश्मीरला गेले व त्या सरकारचे कैदी बनले. काश्मीरातून परत कलकत्यात आले ते त्यांचे निष्प्राण कलेवर ! अशा प्रकारे राष्ट्राची एकता आणि अभंगता कायम ठेवण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद विद्रोहाचे हलाहल पिऊनही शहीद झाले, अमर झाले !



## लेखी हमी देणार नाही

वचनाचा सच्चा माणूस पाहिला, की आपली मान आपोआप झुकते. ‘ बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले ’ असे तुकोबांनाही म्हणावेसे वाटले. कारण सच्चेपण हीच वस्तू जगात फार दुर्मिळ होऊ लागली आहे. या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून दिल्या शब्दाला जागल्याचा देखावा अनेक लोक करतील आणि करतातही. सज्जन आणि दुर्जन यांमधला भेद हाच. सुभाषितकार म्हणतो :

‘ जे मनात तेच वाणीत आणि जे वाणीत तेच कृतीत असे वागणारे लोक ते सदात्मे होत आणि मनात एक, वाणीत दुसरे अन् कृतीत तिसरेच अशा वृत्तीच्या माणसांना दुरात्मेच म्हणायचे !

भारताचे माजी पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांच्या जीवनाचा ‘ बोले तैसा चाले ’ हाच स्थायीभाव होता. असे किती तरी प्रसंग त्यांच्या चरित्रात आहेत, त्यांतला एकच प्रसंग उद्धृत करतो—

लाल बहादुर शास्त्री नैनीच्या तुरुंगात असतानाची गोष्ट. त्यांना एक दिवस एक वाईट बातमी कळली. त्यांची मुलगी अत्यवस्थ आजारी होती.

तिने आपल्या वडिलांचा ध्यास घेतला होता. लालबहादुर त्या वार्तेने अस्वस्थ झाले. पोरीला एकदा भेटावे असे त्यांच्या जिवाने घेतले. ते जेलरपुढे उभे राहिले. 'काय काम ?' म्हणून जेलरने विचारले.

"मुलगी अत्यवस्थ आहे. घरून निरोप आला आहे. आठ दिवस पॅरोलवर सोडणार का ?"

जेलरही जरा चरकला. लालबहादुर जेलमध्ये स्वतःसाठी कधीच काही मागत नसत. जेलचे नियम पाळणे आणि ते शक्य तितके दुसऱ्या कैद्यांना पाळायला लावणे हा त्यांनी आपला धर्म बनवला होता. ते राजबंद्यांची आपसांतील भांडणे सोडवीत. त्यांचे हेवेदावे कमी करीत. त्यांच्या स्वार्थी दुराग्रहाला लगाम घालीत. लालबहादुरांच्यामुळे जेलरचे काम पुष्कळसे सुकर होत होते. लालबहादुर हे एक आदर्श कैदी आहेत हा ठसा जेलरच्या मनावर स्पष्ट उमटला होता. आणि हाच आदर्श राजबंदी आपल्याला आठवडाभर पॅरोलवर सोडण्याची मागणी करीत होता. जेलरच्या मनात त्यांची तशी सुटका करावी, असे लगेच आले. तो सहृदय होता आणि लालबहादुरांना मानणाराही होता. पण त्याच्या डोळ्यांपुढे कायद्याचे कलम दिसत होते. तो म्हणाला,

"महाशय, सुटकेच्या काळात आपण काँग्रेसच्या कोणत्याही चळवळीत भाग घेणार नाही आणि मुदत संपण्याच्या आधी जेलमध्ये परत येईन अशी लेखी हमी द्या. मी लगेच सोडतो."

लालबहादुरांनी दुसऱ्या क्षणीच उत्तर दिले,

"ते होणे नाही. मी तुम्हांला शब्द देतो. जोवर मी बंदी आहे, तोवर मी कधीही काँग्रेसच्या चळवळीत भाग घेणार नाही. पोरीसाठी माझा जीव तळमळतो हे खरे; पण म्हणून मी माझ्या ब्रीदाला कलंक लावणार नाही. माझ्या शब्दावर विश्वास ठेवून मला सोडायचे असेल तर सोडा."

असे म्हणून लालबहादुर लगेच माघारी वळले. जेलर धर्मसंकटात

पडला. सोडावे की न सोडावे ? त्याच्या मनात भवति न भवति सुरू झाली. अशा स्थितीत दोन दिवस गेले. आणि मग लेखी हमी न घेता जेलरने त्यांना आठ दिवसांच्या पॅरोलवर मुक्त केले.

लालबहादुर घरी येतात तो मुलगी शेवटचे क्षण मोजीत होती. घरी सगळाच 'आनंद' होता. चार माणसांना गोळाभर अन्न मिळायचे वांधे. तिथे मुलीच्या औषधोपचारांना पैसा येणार कुठून? त्याचा परिणाम म्हणजे मुलीचा मृत्यू !

ती जणू शेवटचा श्वास सोडायला बापाच्या आगमनाची वाट पाहात होती. लालबहादुरांनी मन कठोर केले अन् मुलीचे प्रेत उचलले. तिचा अंत्यसंस्कार करून ते घरी आले आणि आठ दिवसांची मुदत असतानाही लगेच जेलच्या दारात येऊन उभे राहिले.

जेलरला हे सर्व कळले आणि तोही थरकला !

भारतातल्या एकेका महापुरुषाच्या लहानशा घोषणेने या देशातील कोट्यवधी लोकांच्या जीवनात क्रांती घडवून आणलेली आहे. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे; आणि तो मी मिळवीनच !' ही लोकमान्य टिळकांची घोषणा. तिने ब्रिटिश साम्राज्यसत्तेला जबरदस्त हादरा दिला. त्यानंतर 'छोडो भारत' ही म. गांधींची घोषणा. या घोषणेने भारताचे स्वातंत्र्य जवळ आणले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची 'चलो दिल्ली' ही क्रांतिकारक घोषणा. त्या घोषणेने गांधीजींच्या 'छोडो भारत' या घोषणेला तुफानी सामर्थ्य मिळवून दिले. स्वातंत्र्याच्या काळात 'आराम हराम है' ही पं. जवाहरलाल नेहरू यांची घोषणा. या घोषणेने स्वातंत्र्य सुदृढ करण्यासाठी लोकांनी झटून काम करायला हवे, ही प्रेरणा दिली. आणि नेहरूंच्या पाठीमागून आलेल्या शास्त्रीजींनी घोषणा दिली, ती 'जय जवान, जय किसान !' भारताच्या उद्धाराची आणि संरक्षणाची ही अमर घोषणा आहे. त्याबद्दल शास्त्रीजींच्या द्रष्टेपणाचे आणि प्रतिभेचे जेवढे

कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

या घोषणेतला जय जवान हा भाग भारताच्या स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या जवानाचे महत्त्व सूचित करतो. देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवायचे तर लक्षावधी शूर, वीर आणि देशभक्त जवानांची लढाऊ आघाडी सदैव सिद्ध ठेवायला हवी. देशाच्या संरक्षणाइतकाच अन्नधान्यनिर्मितीचा प्रश्नही राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयपूर्ण, स्वावलंबी आणि समृद्ध झाल्याखेरीज भारताचा जगात निभाव लागणार नाही व त्याची मान ताठ राहणार नाही. म्हणूनच जय जवानबरोबरच जय किसान ही घोषणाही तितक्याच जिद्दीने अंमलात आणली गेली पाहिजे. देशाचे रक्षण जवानांनी करायचे आणि देशाचे पोषण किसानांनी करायचे याचा अर्थ जवानांच्या पराक्रमाला किसानांच्या श्रमाची जोड मिळणे अत्यावश्यक आहे.

राष्ट्राच्या स्वातंत्र्यरक्षणाचे आणि लोकपोषणाचे हे महान रहस्य शास्त्रीजींनी प्रथम ओळखले आणि म्हणूनच ‘ जय जवान, जय किसान ’ हा राष्ट्रोद्धाराचा महामंत्र देऊन नव्या युगाचे रणशिंग फुंकले.

♣ ♣



## गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः

म्हैसूर येथील विश्वविद्यालयातील एक सकाळ. पण ती प्रसन्न स्वरूपात उगवली नव्हती. त्या विश्वविद्यालयाच्या परिसरावर गांभीर्याचे सावट करूनच उगवली होती. त्या विश्वविद्यालयातले एक प्राध्यापक आज म्हैसूर सोडून जाणार होते. कलकत्ता विश्वविद्यालयाचे कुलगुरू सर आशुतोष मुखर्जी यांच्या कानी या तरुण प्राध्यापकाच्या विद्वत्तेची कीर्ती गेली होती. त्यांनी या प्राध्यापकमहाशयांना आपल्या विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून सन्मानाने बोलावले होते. प्राध्यापक महाशयांनी ते निमंत्रण स्वीकारले होते. म्हैसूर विश्वविद्यालयात होते त्यापेक्षा उच्चतर पदावर ते जाणार होते. त्यांच्या दृष्टीने तो भाग्याचा दिवस होता; पण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने तो

दुर्भाग्याचा दिवस होता.

कारण त्या गुरु-शिष्यांचे नाते घनिष्ठ होते, आध्यात्मिक होते. प्राध्यापक आपल्या सर्व विद्यार्थ्यांना पुत्रतुल्य मानून त्यांच्यावर ज्ञानाचे संस्कार करीत होते. प्रत्येकाची नावे त्यांना माहीत होती. प्रत्येकाच्या अडचणी त्यांना ठाऊक होत्या. त्यांचे घर हे एका प्राचीन आचार्यांचे होते. आणि ते सर्वांना मुक्तद्वार होते. विद्यार्थी केव्हाही येत व शंका विचारीत. त्याच्या शंकांचे निरसन करताना प्राध्यापकांना कधीही आळस शिवला नाही. विद्यार्थ्यांच्या प्राणांशी जणू त्यांनी आपल्या पंचप्राणांचे धागे मिळवून टाकले होते. शिकवणे, विद्यार्थ्यांना निःशंक करणे हे जणू त्यांचे जीवनव्रतच होते.

आणि असे हे विद्यार्थ्यांचे परमआदरणीय गुरू आज त्यांना सोडून निघून जाणार होते. त्यामुळे सारे विद्यार्थी खिन्न झाले होते. प्रत्येकाच्या मुखावर उदास भाव ! असे गुरू त्यांना पुन्हा मिळणार नव्हते. पुत्रवत प्रेम करणारे असे आचार्य पुन्हा लाभणार नव्हते. त्यांच्या विद्यार्थिदशेची ती एक उत्कट हानी होती. जो तो एकमेकांशी हेच बोले. सगळ्यांचे चेहरे जणू रडवेले.

असे रडवेले चेहरे घेऊनच ते सारे विद्यार्थी गुरुजींच्या घरापाशी जमले. ते थव्याथव्यांनी आले. पण कोणाचा आवाज नाही. कारण त्यांचा आवाज कुणीतरी चोरला होता. कुणीतरी त्यांचा गळा रुद्ध केला होता.

ठरल्या वेळी दारात घोड्यांची गाडी उभी राहिली. प्राध्यापकमहाशय घरातून बाहेर पडले. पाहतात तो विद्यार्थ्यांची गर्दी. सगळ्यांचे चेहरे खिन्न ! ते दृश्य पाहून गुरुजीही अंतरी कष्टी झाले. त्यांचाही शब्द अवघडला. ते जणू आपले हृदय मागे ठेवूनच जाणार होते. ज्यांच्यावर आपण जिवापाड प्रेम केले आणि जे आपणाविषयी कृतज्ञ, आदराने वागले, असे हे विद्यार्थी ! अशी ही यौवनाचा उंबरठ्यावरची फुले पुन्हा आपल्याला कधी दिसणार नाहीत ! त्यामुळे हृदयात उठणारे कल्लोळ आतल्या आत जिरवीतच ते

गाडीत चढून आसनावर बसले.

आणि एवढ्यात तिथे एक आश्चर्य प्रगटले. विद्यार्थी झटकन पुढे झाले. त्यांनी गाडीचे घोडे सोडून दिले. आणि स्वत: गाडी ओढायला सुरुवात केली. 'अरे, हे काय? काय चालवले आहे तुम्ही, हे?' हा गुरुजींचा प्रश्न अनुत्तरितच राहिला. गुरुजी विद्यार्थ्यांच्या बरोबर चालण्यासाठी गाडीतून उतरू लागले. पण विद्यार्थ्यांनी त्यांना तसे करू दिले नाही. गाडी चालतच राहिली. रस्त्यातले लोक दुतर्फा पाहातच राहिले. मुले आपल्या गुरूची गाडी ओढतात हे दृश्यच विलक्षण होते. ते एक आठवे आश्चर्यच होते. तिथल्या लोकांनी पूर्वी असले काही पाहिले नव्हते आणि पुन्हा असले काही पाहायला मिळणारही नव्हते.

म्हैसूर स्टेशनचा फलाट विद्यार्थ्यांनी खचून भरला होता. सगळे दीनवाणे! गुरुजी त्या विद्यार्थ्यांमधून वाट काढीत कसेबसे आपल्या डब्यापर्यंत पोचले. डब्यात चढून उभे राहिले. गुरू आणि शिष्य यांच्यामध्ये मूकसंवाद सुरू झाला. पण तो शब्दांहूनही अधिक बोलका होता, अधिक करुण होता.

गार्डाने शिट्टी वाजवली. हिरवे निशाण दाखवले. इंजिनाचा भपकारा सुटला. गाडी हालली. गुरुजींचा डबा हळूहळू पुढे सरकू लागला. होता होता तो खूप पुढे गेला. त्यांच्या मागून विद्यार्थ्यांच्या नजरा गेल्या. काही क्षणांतच गुरुमूर्ती अदृश्य झाली. भावनाशील विद्यार्थ्यांनी एवढा वेळ आवरलेले अश्रू त्यांच्या गालांवरून ओघळले. आणि पाठोपाठ तो सगळा रेल्वे फलाट गर्जून उठला.

गुरू सर्वपल्ली राधाकृष्णन् की जय ॥

होय. ते डॉ. राधाकृष्णनच होते. तेच म्हैसूरहून कलकत्याला चालले होते आणि पुढे तेच भारताचे दुसरे राष्ट्रपती झाले होते.

डॉ. राधाकृष्णन यांचे सारे शिक्षण भारतातच झाले. इथेच ते श्रेष्ठ

तत्त्वज्ञानी झाले. हिंदुधर्माच्या गौरवगाथेचे गायक बनले. कुणीतरी त्यांना एक दिवस विचारले. ' तुम्ही शिकण्यासाठी विलायतेस गेला नाहीत. खरं ना ? '

' शिकण्यासाठी गेलो नाही पण शिकविण्यासाठी जरूर जाईन ' हे राधाकृष्णनांचे आत्मविश्वासाचे उत्तर !

आणि अशात १९२६ साल उजाडले त्या वेळी ब्रिटिश साम्राज्यातील सर्व विद्यापीठांतील विद्वानांचे एक संमेलन केंब्रिज युनिव्हर्सिटीत आयोजित करण्यात आले होते. त्याचे निमंत्रण कलकत्ता विद्यापीठालाही मिळाले. सदर विद्यापीठाने त्या अपूर्व संमेलनासाठी डॉ. राधाकृष्णन यांना आपला प्रतिनिधी म्हणून पाठविले.

राधाकृष्णन इंग्लंडला गेले. पण त्या अवधीत त्यांचा कीर्तिसुगंध पाश्चात्य जगात दरवळला होता. कारण तिकडे जाण्याच्या आधीच ' भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास ' हा इंग्रजी ग्रंथ परिश्रमपूर्वक व सखोल चिंतनाच्या आधारावर त्यांनी लिहिला होता. एक इंग्रज प्रोफेसर श्री. म्यूरहेड यांनी या ग्रंथलेखनासाठी आग्रह केला होता. सदर ग्रंथ इंग्लंडमध्येच छापून प्रसिद्ध झाला होता. तो ज्या ज्या विद्वानांनी वाचला होता, ते ते प्रभावित झाले होते.

राधाकृष्णन इंग्लंडमध्ये येणार असे कळताच तिकडच्या अनेक व्यक्ती आणि संस्था सावध झाल्या. त्यांनी राधाकृष्णनूना पत्रे लिहून त्यांचे स्वागत केले आणि त्यांना व्याख्यानाचे निमंत्रणही दिले. त्यांतच एक निमंत्रण डॉ. जॅक्स यांचे होते. हे गृहस्थ हिब्बर्ट नावाच्या एका सुप्रसिद्ध नियतकालिकाचे संपादक होते. तसेच ते ऑक्सफर्डच्या कॉलेजचे प्रिन्सिपॉलही होते. तत्पूर्वी त्या दोघांचा लेखणीच्या द्वारे परिचय होता. डॉ. जॅक्स यांच्या नियतकालिकात डॉ. राधाकृष्णन यांनी काही लेख लिहिले होते. त्या लेखांवरून त्यांनी डॉ. राधाकृष्णन यांची विद्वत्ता

जाणली होती.

ऑक्सफर्डला व्याख्यानासाठी निमंत्रण येणे हा त्या काळी मोठाच बहुमान समजला जाई. ते येरा गबाळांचे काम नव्हते. राधाकृष्णन यांनी तिथे काही व्याख्याने दिली. विषय होता 'हिंदूंचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन.' राधकृष्णन उभे राहिले. त्यांची रसवंती सुरू झाली. अस्सल इंग्रजांनाही आश्चर्यचकित पाहायला लावील अशी त्यांची प्रौढ, प्रगल्भ भाषा. श्रोते जणू मंत्रमुग्ध झाले. भाषा आणि विचार या दोन्ही दृष्टींनी ते इंग्रज विद्वानांवर छाप पाडून गेले.

या व्याख्यानांनी इंग्लंडमधील विचारवंतांचा भारताविषयीचा दृष्टिकोन बदलण्याला बरीच मदत झाली. भारत म्हणजे मागासलेला, रानवटांचा देश अशीच त्यांची समजूत होती. पण राधाकृष्णन यांची व्यापक तितकीच खोल बुद्धिमत्ता आणि तिच्या जोडीला विनय, नम्रता, हे गुणविशेष पाहून इंग्रज पंडितांना भारताविषयीच्या अज्ञानाची कल्पना आली. त्यांनी म्हटले, 'आम्हां युरोपियन लोकांना हिंदुधर्माची ओळख त्यांच्या इतकी दुसऱ्या कुणीही करून दिली नाही.'

व्याख्यानानंतर केलेल्या समारोपाच्या भाषणात डॉ. जॅक्स डॉ. राधाकृष्णन यांना उद्देशून म्हणाले, 'भारताच्या बाहेर आमच्याच विश्वविद्यालयात येऊन तुम्ही आपलं व्याख्यानसत्र सादर केलंत, याने आमच्या गौरवात भर पडली आहे!"

आपण हिंदुधर्माचा सर्वांगीण व सखोल अभ्यास करण्यास का प्रवृत्त झालो, या विषयी डॉ. राधाकृष्णन आपले विचार व्यक्त करतात, ते असे—

"मी ख्रिश्चनांनी काढलेल्या शाळेत शिकलो. ज्या वेळी मनावर खोल ठसे उमटतात असे ते माझे बालवय होते. त्या वेळी केवळ बायबलशीच माझा परिचय झाला असे नाही, तर हिंदुधर्मावरील कठोर टीका मी ऐकली. स्वामी विवेकानंदांच्या प्रभावी भाषणांचाही खूप परिणाम माझ्यावर झाला

होता. त्याने माझ्या ठायीच्या सुप्त हिंदुत्वाला जागृत केले होते. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संस्थांमधून हिंदू लोकांना जी वागणूक मिळत असे, ती पाहून माझे चित्त विचलित होई. आमच्या आर्य संस्कृतीची जोपासना करणारे आमचे प्राचीन ऋषिमुनी अधार्मिक होते, हे मान्य करायला मी कदापीही तयार नव्हतो. इकडे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी माझ्या अंतःकरणात खळबळ उडवून दिली, तर तिकडे स्वामी विवेकानंदांनी माझ्या हिंदुत्वावर फुंकर मारली. याचा परिणाम असा झाला की, मी हिंदुधर्म आणि तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्याचा व खरोखर सत्य काय आहे, हे जाणून घेण्याचा संकल्प केला."



## दोन तेजस्वी पत्रे

सँडर्स या अत्याचारी गोऱ्या पोलिस अधिकाऱ्याची हत्या करून सरदार भगतसिंग लाहोर येथे फाशी गेला, हे सर्वांना ठाऊक आहे. असायलाच हवे. भारताच्या स्वातंत्र्याची गौरवगाथा आपल्या पवित्र रक्ताने लिहून तो इतिहासात अजरामर झाला आहे.

दिसला गोरा की घाल गोळी, अशी ही वेडाचारी हत्या नव्हती. या हत्येला कारण तसेच घनगंभीर होते. ते जड पाषाणाचीही रक्त तापवणारे होते.

मॉंटग्यू-चेम्सफर्ड यांनी सुचविलेल्या सुधारणांना अनुसरून ब्रिटिश सत्तेने जो कायदा केला, त्या अन्वये स्वराज्याच्या दुसऱ्या हप्त्यात हिंदुस्थानला कोणते अधिकार कशा प्रकारे दिले जावे, ते ठरविण्यासाठी श्री. सायमन यांच्या नेतृत्वाखाली सात सभासदांचे एक कमिशन ३ फेब्रुवारी

१९२८ रोजी इंग्लंडच्या राजसत्तेने हिंदुस्थानात पाठविले. हे कमिशन प्रथम मुंबईस उतरले. काँग्रेसने त्याच्यावर बहिष्कार घालण्याचे ठरविले होते. कारण त्या कमिशनवर भारताचा एकही प्रतिनिधी घेतलेला नव्हता. त्यामुळे मुंबईस आल्याआल्या ' सायमन परत जा ' अशा घोषणा लक्षावधी कंठांतून दुमदुमल्या. सायमनला काळी निशाणे दाखवली गेली. देशभर निदर्शने झाली आणि हरताळही पडले. सगळा देश ढवळून निघाला.

३० आक्टोबरला हे कमिशन पंजाबमध्ये लाहोर येथे पोचणार होते. देशात झालेली उग्र निदर्शने पाहून पंजाब सरकार त्या बाबतीत कडेकोट बंदोबस्ताला लागले. जिल्हा मॅजिस्ट्रेटने शहरात १४४ वे कलम पुकारून मिरवणुका आणि जमाव यांना बंदी केली.

पण सगळा पंजाब खवळून उठला होता. तिथल्या लोकांनी ते बंदी कलम मोडायचे ठरविले. पंजाबकेसरी लालालजपतराय यांनी या आंदोलनाची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. सायमनसाहेबाची गाडी स्टेशनात येताच बाहेर जमलेल्या प्रचंड जनसमूहाने ' सायमन परत जा 'या घोषणेचा गदारोळ उठविला. सायमनसाहेबाचा रस्ता मोकळा करण्यासाठी पोलिसांनी लोकांना धमक्या दिल्या. पण त्यांना कोणी कोणी भीक घालीत नाही असे दिसताच त्यांनी तडातड लाठीमार करण्यास सुरुवात केली. लोकांनी लाठ्या खाल्ल्या, पण जागा सोडली नाही.

त्या रणगर्दीत लालाजी आघाडीवर होते. ते जोपर्यंत जागेवरून हालत नव्हते, तोवर कोणीही हलायला तयार नव्हते. गर्दी तसुमात्र हटत नाही असे पाहताच पोलिसांची माथी भडकली. लाहोरचा डी. एस. पी. सँडर्स हा खुद्द लालाजींवर धावून गेला. त्या वयोवृद्ध पुढाऱ्याच्या छातीवर त्याने लाठीचे तडाखे हाणायला सुरुवात केली. पोलिसांचा तो रुद्रावतार पाहून लालाजींना वाटले, की आता रक्तपात होईल. काही माणसे नाहक मृत्यु-मुखी पडतील. हे जाणून लालाजींनी लोकांना निघून जायला सांगितले;

पण तरीही त्यांना मार बसायचा तो बसलाच.

त्यानंतर झालेल्या विराट सभेत लालाजींनी पंजाब सरकारला रोकठोक बजावले,

"तुम्ही माझ्या छातीवर लाठी हाणली नाही. ती तुम्ही तुमच्या साम्राज्याच्या काळजावरच मारली आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या असल्या क्रूर अत्याचारांनी देशातल्या तरुणवर्गावरचा आमचा ताबा सुटेल आणि असा खवळून उठलेला तरुणवर्ग क्रांतीच्या मार्गाकडे वळला तर त्याची सर्व जबाबदारी सरकारवर राहील!!"

दुर्दैवाची गोष्ट ही की, ते लाठीचे प्रहार लालाजींच्या हृदयाला सहन झाले नाहीत. ते आजारी झाले, अंथरुणाला खिळले. आणि १७ नोव्हेंबर १९२८ रोजी इहलोक सोडून गेले. त्यांच्या मृत्यूने पंजाब पोरका झाला.

त्याच क्षणी पंजाबमधले शोकाकुल क्रांतिकारक भडकून उठले. सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरू, यशपाल, इ. त्यांची नावे होती. लालाजींच्या मृत्यूनंतर ते गुप्तपणे एकत्र जमले. लाहोरच्या मजंग मोहल्ल्यात एका घरी त्यांची ही गुप्त बैठक भरली. लालाजींचा मारेकरी सँडर्स यापुढे जिवंत राहता कामा नये, असा निर्णय त्या गुप्त बैठकीत घेतला गेला.

आणि त्यानंतर थोड्याच दिवसांत भर रस्त्यात सॉंडर्सवर पहिली गोळी शिवराम राजगुरू याने झाडली. सँडर्स मोटारसायकलसह खाली कोसळला. पण तो मेला नव्हता. ते काम भगतसिंगाने लागोपाठ तीन गोळ्या झाडून पुरे केले.

या घटनेने लाहोरचे पोलिस हादरले. हिंदुस्थान सरकारही हादरले. एवढे कशाला! इंग्लंडचे सरकारही हादरले. पण कोणाला धरायचे! कोणाला पकडायचे? कोण होते हे क्रांतिकारक? काही पत्ता लागेना! सुगावाही लागेना. लाहोरचे पोलिसखाते पुरते गोंधळून गेले. पण आरोपी हुडकून काढायलाच हवा होता. त्यासाठी लाहोरबाहेर जाणाऱ्या सर्व

मार्गांवर पोलिस पहारा बसवला. गुप्त हेरांचे जाळे शहरभर पसरून ठेवले. शहरात दहशतीचे वातावरण निर्माण केले. पण एवढ्या कडेकोट बंदोबस्तातही दुसऱ्या दिवशी भिंतींवर चिकटविलेली लाल रंगातली पत्रके लोकांना व पोलिसांना वाचायला मिळाली. त्यांवर लिहिले होते—

"सँडर्स मेला! लालाजींच्या हत्येचा सूड उगवला गेला!! क्रांती चिरायू होवो!!!"

पोलिसांची ती धावपळ पाहिल्यावर मात्र भगतसिंगाने ओळखले, की आज ना उद्या पोलिसांचा हात आपल्यावर पडल्यावाचून राहणार नाही. मग त्याने लाहोरातून पलायन करायचे ठरविले.

भगतसिंग हा शीख होता. त्याचे केस आणि दाढी वाढलेली होती. या दाढीचा त्याला मोठा धोका होता म्हणून त्याने आपले केस इंग्रजी पद्धतीने व्यवस्थित कापून घेतले. सुरेख सूट परिधान केला. डोक्यावर फेल्ट हॅट घातली. बरोबर काही बॅगा घेतल्या. त्यांवर सुंदर लेबले लावली. त्याच्या या साहसी नाट्यात एका तितक्याच साहसी स्त्रीने भाग घ्यायचे ठरविले. तिचे नाव होते दुर्गादेवी. ती लाहोरात होती आणि तिचे क्रांतिकारक पती भगवतीचरण बोहरा हे कलकत्त्यात अज्ञातवासात होते. भगतसिंगाच्या या पलायननाट्यात दुर्गादेवीने त्याच्या पत्नीची भूमिका घेतली. हे चित्र पूर्ण व्हावे म्हणूनच की काय, तिने आपला तीन वर्षांचा मुलगा आपल्याबरोबर घेतला. राजगुरू हा भगतसिंगाचा गणवेषातला ऑर्डर्ली बनला. आपल्या 'साहेबाचा' टिफिनचा डबा हातात धरून तो स्टेशनात पहिल्या वर्गाच्या डब्यापुढे उभा राहिला. जणू काही एखादा अधिकारी लाहोरहून बदली होऊन बाहेर जात आहे. अशी ही बतावणी होती. लाहोर स्टेशनवर गाडी येताच ही सर्व मंडळी गाडीत चढली आणि साऱ्या गुप्त हेरांच्या डोळ्यांत धूळ फेकून लाहोरहून पसार झाली. सरळ आणि बिनधोक हावडा स्टेशनवर जाऊन उतरली.

भगतसिंग कलकत्याला पोचला त्याच दिवसांत तिथे काँग्रेसचे अधिवेशन चालू होते. भगतसिंग त्या अधिवेशनात मिळून मिसळून गेला. त्याने मग तिथल्याही क्रांतिकारकांशी संधान बांधले.

पुढे भगतसिंग कलकत्याहून दिल्लीला आला. तिथेही त्याने असाच एक आवाजी पराक्रम केला. ८ एप्रिल १९२९ रोजी त्याने दिल्लीच्या असेंब्लीत कामकाज चालू असता बाँबचा स्फोट केला व पत्रके उधळली. त्या वेळी त्याच्या समवेत बटुकेश्वर दत्त हा तरुण होता. आपल्या हातातली पिस्तुले फेकून देऊन ते दोघे पोलिसांच्या स्वाधीन झाले. पोलिसांनी त्या दोघांवर रीतसर खटला भरला आणि त्यात दोघांनाही जन्मठेपेची शिक्षा झाली.

पण अजून पंजाब पोलिसांना सँडर्सचा खुनी सापडला नव्हता. ते त्याच्या शोधासाठी अहोरात्र प्रयत्न करीत होते. अखेर एका लोहाराकरवी पोलिसांना त्याची अन् त्याने उभारलेल्या कटाची माहिती मिळाली. त्यात काही कटवाले तरुण पकडले गेले. अधिक माहिती मिळविण्यासाठी पोलिसांनी त्यांचा अनन्वित छळ सुरू केला. त्या मारपिटीने दोन तरुण ढेपाळले. त्यांनी धडाधड नावे सांगायला सुरुवात केली. सँडर्सचा खून भगतसिंगाने केला हेही सांगून टाकले. मग काय विचारता! पोलिसांना घबाडच मिळाले. निरनिराळ्या प्रांतांतील ३२ राजबंद्यांना पोलिसांनी लाहोरच्या तुरुंगात आणले. भगतसिंग हा पहिल्या क्रमांकाचा आरोपी ठरला. त्याच्यावर रीतसर खटला सुरू झाला. तो बरेच दिवस चालला. तुरुंगाच्या कोठडीतही उपोषणादी अस्त्रे उपयोजून या क्रांतिकारकांनी सरकारला सळो की पळो करून सोडले. निदर्शने करण्याची कुठलीही संधी राजबंद्यांनी वाया जाऊ दिली नाही. भरकोर्टात अनेक ‘दिन’ त्यांनी निदर्शने करून साजरे केले. ‘वंदे मातरम्’ हे राष्ट्रगीत म्हणत म्हणतच ते कोर्टात येत. अखेर खटल्याचा शेवटचा दिवस उगवला. ७ ऑक्टोबर १९३० रोजी खटल्याचा निकाल न्यायमूर्तींनी दिला. त्या

निकालात सरदार भगतसिंग, शिवराम राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती.

त्या नरवीरांनी ती शिक्षा आपल्या निधड्या छातीवर हसतमुखाने झेलली.

पण ती शिक्षा ऐकून साऱ्या देशाला मात्र फार मोठा धक्का बसला. देशभर संतापाची लाट उसळली. या देशभक्तांची मुक्तता व्हावी, निदान त्यांची फाशी तरी रद्द व्हावी म्हणून भारतातल्या कोनाकोपऱ्यांतून प्रयत्न झाले. चळवळी झाल्या. सभा झाल्या. तारा झाल्या. पण कशाचाही उपयोग झाला नाही. सरकार जणू सूडाने पेटल्यासारखे वागले.

पण सँडर्सवर बेलाशक पिस्तुल चालवणारा, त्याला यमसदनाला पाठविणारा आणि मानवी रक्त सांडणारा भगतसिंग हा कोण दैत्य-दानव होता काय ? मुळीच नाही. तो भावनाशील होता. मनाचा हळुवार होता. मानवी रक्ताला पवित्र मानणारा होता. पण नाइलाज म्हणून त्याला पिस्तुल हातात घ्यावे लागले. बहिऱ्या साम्राज्यशाहीच्या कानांचे पडदे फाटतील एवढा आवाज काढून तिला धक्का द्यावा, या उद्देशाने त्याने बॉंब व पिस्तुल यांचे आवाज काढले.

भगतसिंगावर फार चांगले संस्कार होते. विश्वविद्यालयात शिक्षण घेऊन तो बी. ए. झाला होता. त्याला वाचनाचा विलक्षण हव्यास होता. इतिहास, राजकारण आणि अर्थशास्त्र यांचा सखोल अभ्यास त्याने केला होता. अनेक स्वतंत्र व परतंत्र राष्ट्रांचे इतिहास त्याला मुखोद्गत होते. काही दिवस त्याने शिक्षकाचा पेशाही स्वीकारला होता. तो जर क्रांतिकारक झाला नसता, तर एक नामांकित प्राध्यापक झाला असता.

अखेर एके दिवशी भगतसिंग फाशीच्या तक्तावर चढला, हे आता एक ज्वलंत सत्य ठरले आहे; पण फासावर जाण्यापूर्वी त्याने जी दोन पत्रे लिहिली आहेत, ती त्याच्या व्यक्तिमत्त्वाला विलक्षण उजळा देणारी आहेत. पहिले

पत्र त्याने आपल्या वडिलांना लिहिले आहे. आपला मुलगा फाशी जाऊ नये म्हणून तो वत्सल पिता काही प्रयत्न करीत होता. मुलाच्या बचावासाठी त्याने ट्रायब्यूनलकडे अर्ज केला होता. हे जेव्हा भगतसिंगाला कळले तेव्हा तो अत्यंत अस्वस्थ झाला. व्यथित झाला. तशाच त्या मनःस्थितीत त्याने वडिलांना पत्र लिहिले—

" प्रिय पिताजी ! तुम्ही माझ्या बचावासाठी ट्रायब्यूनलकडे अर्ज केलात हे ऐकून पराकाष्ठेचे आश्चर्य तर वाटलेच; शिवाय मनाला असह्य धक्काही बसला. या वेळी आणि अशा परिस्थितीत असा भेकड अर्ज करावा, असे तुम्हांला वाटले तरी कसे ? राजकीय बाबतीत तुमचे व माझे मतभेद होते आणि आहेत. तथापि तुमच्या पसंती नापसंतीची कदर न बाळगता मी आजवर मला योग्य वाटले तेच करीत आलो आहे, हे तुम्हांला माहित आहे. आणि म्हणून तुमच्याविषयी माझ्या मनात आदर बाळगूनही मी तुम्हांला एक गोष्ट स्पष्ट सांगतो, की मला न कळवता माझ्यातर्फे असा अर्ज करण्याचा तुम्हांला अधिकार नव्हता.

माझ्यावर किती गंभीर आरोप असले तरी खटल्याच्या कामकाजाविषयी मी पूर्ण बेफिकीर राहण्याचे ठरविले आहे. माझ्या प्राणांचे तुम्हांला वाटते, तितके मोल मला वाटत नाही. उच्च तत्त्वांच्या मोबदल्यात वाचविण्याइतका माझा प्राण मोलाचा नाही. तुम्ही मला वाचवण्याचा प्रयत्न केलात, यामुळे माझ्या पाठीत सुरा खुपसल्यासारखे झाले आहे. असा प्रयत्न दुसऱ्या कोणी केला असता तर मी त्याला देशद्रोही व विश्वासघातकी म्हटले असते. पण तुम्ही माझे वडील आहात, म्हणून इतकेच म्हणतो, की तुम्ही तुमच्या मनाचा कमकुवतपणा दाखवलात. ही वेळ कुटुंबातल्या प्रत्येकाच्या वज्रपरीक्षेची होती. तिच्यात तुम्ही अपेशी ठरलात ! "

सरदार भगतसिंगाचा व त्याच्या सहकाऱ्यांचा अपमान करण्यासाठी पंजाब सरकारने त्यांना कळविले, ' फाशी टळावी असे तुम्हांस वाटत

असेल तर तुम्ही स्वतः दयेचा अर्ज करा.' या निरोपाला भगतसिंगाने जे उत्तर पाठविले, ते किती बाणेदार होते, ते प्रत्यक्ष वाचा—

" सरकार म्हणते, की ' तुम्ही दयेचा अर्ज करा.' पण का म्हणून ? आम्ही का चोर आहो, डाकू आहो का मवाली ? आम्ही तर स्वातंत्र्ययुद्धातले राजबंदी आहोत. आमच्या नसानसांत पूर्ण स्वातंत्र्याचे रक्त खेळत आहे. आम्ही जे हे साहसकर्म आचरले ते स्वातंत्र्यासाठीच. आम्ही अहिंसेचे उपासक नसू, आमचा मार्गही अनत्याचारी नसेल, पण आम्ही स्वातंत्र्यसैनिक आहोत, हे तर खरे ना ? सरकारजवळ न्यायाचा तिळमात्र अंश असेल तर त्याने आम्हांला राजबंदी म्हणूनच वागवले पाहिजे. आम्ही दयेची भीक कधीही मागणार नाही.

कसे तरी करा आणि आमची फाशी चुकवा असे म्हणून आम्ही काळ्या पाण्यावर जाण्याची इच्छा धरलेली नाही. फाशीच्या फळीवर चढणे हेही आम्हांस पसंत नाही. आम्ही वीर, मर्द आहो ! आम्हांला तसे मानून तुम्ही गोळ्या घाला किंवा तोफेच्या तोंडी द्या. फाशीसारखी फुसकी शिक्षा कोणी भोगावी ? आमच्या या शेवटच्या इच्छेला सरकारने मान द्यावा अशी आमची विनंती आहे ! '

पण तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांना सहृदयता नावाची वस्तूच ठाऊक नव्हती !

❀ ❀



## भगीरथाचा वारस

कृष्णराजसागर हे एक महान धरण आहे. पुण्यसलिला कावेरी नदीला घातलेला तो एक अजस्र बंधारा आहे. ८६०० फूट लांब, १११ फूट रुंद, त्याच्या माथ्यावर ५० फूट प्रशस्त राजमार्ग, उंची १४० फूट. ५० चौरस मैल क्षेत्र या धरणाने व्यापले आहे. हा एक प्रतिसमुद्रच आहे. जे काम पाहण्यासाठी परदेशातील महान तंत्रज्ञ मुद्दाम इथे येऊन गेले, असे हे भव्य काम. म. गांधीजी म्हणाले, 'हे धरण म्हणजे जगातली एक अजोड कामगिरी आहे!'

म्हैसूरपासून चौदा मैलांवर हा कृष्णराजसागर लहरतो आहे, हेलावतो आहे. त्याच्या शेजारी एक सुंदर आणि विस्तृत असे उद्यान आहे. त्याचे नाव ठेवले आहे वृंदावन उद्यान. हजारो माणसे रोज या उद्यानाचे नयन-

सुख उपभोगायला तिथे जातात. ते पाहून डोळियाची धणी फिटते. या जलाशयाच्या जीवनावरच हे वृंदावन उद्यान फुलते, बहरते. कृष्णराज हे त्या धरणाचे नामकरण केले आहे, ते तत्कालीन म्हैसूर संस्थानच्या राज-नामावरून.

स्वातंत्र्यपूर्व काळातली ही एक भव्य निर्मिती आहे. कुणी बांधले हे धरण? कोण याचा शिल्पकार? सांगतो. त्याचे नाव आहे भारतरत्न मोक्षगुंडम् विश्वेश्वरैय्या. भारतरत्न ही सर्वोच्च किताबत स्वतंत्र भारताच्या पहिल्या राष्ट्रपतींनी त्यांना मोठ्या गौरवाने दिली. मोक्षगुंडम् हे त्यांच्या गावाचे नाव. हे गाव आंध्र प्रदेशात येते आणि विश्वेश्वरैय्या हे त्यांचे व्यक्तिनाम होय.

या धरणाची कथा म्हणजेच श्री. विश्वेश्वरैय्यांच्या पराक्रमाची गाथा आहे—

कावेरी नदीवर एक प्रचंड धरण उभारण्याची कल्पना फार जुनी होती. टिपू सुलतान याच्या डोक्यात प्रथम ती उद्भवली. त्याने धरणाची पाया-भरणीही केली होती. पण त्याच्या मृत्यूने ही योजना बारगळली. १९०२ साली पुन्हा या योजनेने उचल खाल्ली. कारण या धरणातल्या पाण्यावर हजारो लोकांचे संसार सुखमय होणार होते. एक लाख पन्नास हजार एकर जमीन या धरणाखाली भिजणार होती. कोलार येथे सोन्याच्या खाणी होत्या. त्यांना अधिक वीजेची गरज होती. हे धरण झाल्याने इथली बिजली चमकत चमकत तिकडे जाणार होती. पण दुर्दैव या योजनेचे. दुर्दैव कावेरीच्या कन्यापुत्रांचे. त्याही वेळी ती योजना कल्पनेच्या गर्भातच विरघळली!

आणि मग १९०९ साल उजाडले. म्हैसूर सरकारच्या प्रमुख इंजिनि-अरच्या पदाची सूत्रे विश्वेश्वरैय्यांनी आपल्या हाती घेतली. या योजनेच्या अपयशाची कथा त्यांनी आधीच ऐकली होती. विश्वेश्वरैय्यांनी तीच योजना

पुढे घेतली. ते कावेरीच्या काठाकाठाने खूप हिंडले. धरणाचे स्थान कुठे असावे हे मागचे सगळे कागदपत्र बाजूला ठेवून त्यांनी स्वतःच्या बुद्धीने, स्वतंत्र विचाराने ठरवले. योजनेचा तपशीलवार आराखडा तयार करून म्हैसूरच्या महाराजांच्याकडे पाठवून दिला.

त्या काळच्या साडे बारा कोटी रुपयांच्या खर्चाची ती योजना ! तो आकडा पाहताच महाराजांची छाती दडपली. एवढा पैसा आणायचा कुठून ? महाराज विचारमग्न झाले. योजनेला हात घालावा की घालू नये अशा संभ्रमात पडले. ‘ हम भी कुछ कम नही ’ अशी शेखी मिरवणारे काही इंजिनिअर राज्यात होते आणि ते विश्वेश्वरैय्यांना पाण्यात पाहत होते ते महाराजांच्या कानाला लागले. आणि कुजबुजले इथे धरण होणार नाही.’ त्यामुळे महाराजांचा संभ्रम अधिकच वाढला.

पण ती योजना महाराजांना धुडकाविताही येईना. तो आराखडा, ज्याने सिंधमधले सक्कर धरण उभारले अशा बुद्धिमान आणि अनुभवी तंत्रज्ञाचा होता. त्या आराखड्याच्या शब्दाशब्दांमधून आत्मप्रत्यय जाणवत होता. अखेर हो ना करता करता महाराजांनी त्या धरणाच्या योजनेला संमती दिली. विश्वेश्वरैय्यांच्या योजनेत महाराजांनी कसल्याही प्रकारची काटछाट सुचविली नाही. त्यांनी विश्वेश्वरैय्यांवर विश्वास ठेवला आणि त्यांना संपूर्ण स्वातंत्र्य दिले.

आता सदर विश्वासाला पुरेपूर उतरण्याची जबाबदारी विश्वेश्वरैय्यांवर येऊन पडली. कार्याचा श्रीगणेशा झाला. बांधकाम सुरू झाले. इंचाइंचाने धरणाची भिंत वर चढू लागली. अडचणी खूप आल्या. संकटे धाविन्नली. होता होईतो विश्वेश्वरैय्यानी वेळापत्रक बदलू दिले नाही. सर्व संकटांना धैर्याने तोंड देत ते धरण फुटाफुटाने वर चढू लागले. विश्वेश्वरैय्यांनी स्वतः कधी आळस केला नाही. कोणाला करू दिला नाही. त्यांनी एक महान मानव-यंत्र निश्चित गतीने चालविले.

आणि एवढ्यात निसर्गाने त्या महान कार्याला एक महान दणका दिला. अचानक पाऊस आला. आला तो काही दिवस हाललाच नाही. जणू कावेरीवर आभाळातून अभिषेकाची मुसळधार सुरू झाली. सगळीकडे पाणीच पाणी. शेकडो गावे पाण्याच्या वेढ्यात सापडली. धरणावरचे मजूर प्राणभयाने पळून गेले. सगळीकडे शुकशुकाट ! झोपड्या उद्ध्वस्त ! चिखलाचे साम्राज्य ! हे अस्मानी संकट महाराजांना जाणवले. त्यांनी म्हटले, ' आता काही दिवस काम बंद ठेवा.'

कोलारच्या सोन्याच्या खाणी इंग्रज अधिकाऱ्यांच्या ताब्यात होत्या. त्या खाणींना ठराविक मुदतीत वीज देण्याचा करार झाला होता. तिथल्या खाणप्रमुखाला वाटले, की आता धरण लवकर पुरे होणार नाही. आणि कराराच्या मुदतीत वीजही मिळणार नाही. पण त्यानेही सहानुभूती दर्शविली. तो म्हणाला, ' वीज थोडी उशीरा मिळाली तरी चालेल.'

पण विश्वेश्वरैय्या म्हणाले, ' धरण ठरल्या मुदतीत पूर्ण होईल. कोलारच्या खाणींना वीज ठरलेल्या मुदतीतच मिळेल.' उशीर आणि कालापव्यय हे शब्दच विश्वेश्वरैय्यांना मंजूर नव्हते. त्यांनी म्हैसूरमधले आपले वास्तव्यस्थान सोडले. ते धरणावरच मुक्कामाला गेले. तिथेच त्यांनी तंबू ठोकला. त्यांनी प्रथम मजुरांना पुनश्च एकत्र केले. गाळ काढला. झोपड्या उभ्या केल्या. पडझड बुजवली. थोड्याच कालात पुन्हा कामाला वेग आला आणि तो त्यानंतर कधीही खंडित झाला नाही. ठरलेल्या मुदतीत धरण पुरे झाले. ठरलेल्या मुदतीतच कोलारच्या खाणींना वीज पोचती झाली. सर्व लोक थक्क झाले. भल्या भल्या तंत्रज्ञांनी तोंडात बोटे घातली. हा कामाचा झपाटा काही वेगळाच होता. ही जिद्द भगीरथाची होती !

विश्वेश्वरैय्यांनी आपल्या जीवनात अनेक महान कार्ये उभी केली. पण त्या सर्वांत कृष्णराजसागराची निर्मिती श्रेष्ठ अन् बेजोड ठरली आहे. विश्वेश्वरैय्या मरूनही अमर झाले, ते कृष्णराजसागरामुळे.

गौरवाची तीन विशेषणे मी त्यांना लावतो. निःस्पृह, निरलस आणि परिपूर्ण तंत्रज्ञानी. पुढची दोन विशेषणे कृष्णराजसागराने सार्थ केली आहेत. पहिले निःस्पृहतेचे विशेषण तितक्याच तोलामोलाचे आहे. त्याचाच किस्सा सांगतो.

ओडिसा प्रदेशात एकदा तिथल्या नद्यांना अचानक महापूर आला. आजूबाजूचा प्रदेश जलमय झाला. गावेच्या गावे पुराच्या तडाख्यात सापडली. हजारो माणसे बेघर झाली. उभी पिके बुडाली, वाहून गेली. असा सर्वत्र हाहाकार !

म. गांधींना ही वार्ता कळली. ते दुःखी झाले. दरवर्षी ओडिसा प्रदेशात महापूर यायचे. दरवर्षी लहानमोठी माणसे विपन्न दशेला जायची. या महापुरांचा काही तरी बंदोबस्त करणे आवश्यक आहे, असे गांधीजींना वाटले. त्यांनी विश्वेश्वरैय्यांना ताबडतोब एक पत्र लिहिले. ' कृपया तुम्ही ओडिसात जावे आणि तिथल्या महापुरांचे नियंत्रण कशा प्रकारे करता येईल याची योजना आखावी.'

गांधीजींची आज्ञा ! ती पाळायलाच हवी होती. विश्वेश्वरैय्या ताबडतोब ओडिसाचे मार्गस्थ झाले. त्यांनी तिथल्या नद्यांची नीट पाहणी केली. तिथली माती अभ्यासली. तिथला भूगोल अभ्यासला. हरएक प्रकारची आवश्यक ती माहिती जमा केली. या सर्व माहितीच्या आणि पाहणीच्या आधारावर त्यांनी एक निश्चित योजना तयार करून ती ओडिसा सरकारकडे सोपवून ते मोकळे झाले. त्यापुढची हकीगत श्री. राजा मंगळवेढेकर लिहितात—

काही दिवसांनंतर टपालाने अचानक एक मोठ्या रकमेचा चेक विश्वेश्वरैयांच्या हाती आला. पाहतात तो, योजना बनवून दिल्याबद्दलचा मोबदला म्हणून ओडिसा सरकारने ही रक्कम पाठविली होती !

वस्तुतः तो श्रमाचाच मोबदला होता. अन्य कोणी तो स्वीकारलाच असता. पण ' विश्वेश्वरैय्या ' मग झाले नसते. कोणी एक मोठा, हुषार

इंजिनिअर खूपखूप पैसा मिळविणारा, तथाकथित सुखी, प्रतिष्ठित वगैरे....
' विश्वेश्वरैय्या ' हे एका प्रतिभावान इंजिनिअरचे नाव होतेच, पण त्याही-पेक्षा एका देशनिष्ठ, लोकहितकारी, तत्पर अशा आधुनिक भगीरथाचेही होते, हे विसरून चालणार नाही.

विश्वेश्वरैय्या यांनी तो मोठा चेक तसाच एका पाकिटात घातला, आणि ओडिसा सरकारकडे तसाच धाडून दिला. चेकसोबत लिहिलेल्या पत्रात त्यांनी कळविले होते, " गांधीजींच्या आज्ञेवरून मी तेथे आलो होतो. सरकारकडून चेक स्वीकारण्याचा हक्क मला नाही."

' आराम हराम है ' ही पं. नेहरूंची घोषणा. त्याच धर्तीवर श्री विश्वेश्वरैय्या लोकांना सांगतात—

" कष्ट करा, काम करा! काम केल्यावाचून कोणाला खाण्याचा अधिकार नाही. आ.ण अविरत कार्यमग्न असण्यातच आपले आणि देशाचे कल्याण आहे. आपण आळशी ठरलो म्हणून जगात मागासलेले राहिलो. त्या जपानकडे पाहा. त्या अमेरिकेकडे पाहा. ते लोक खूप मेहनती आहेत. त्यांनी आळसाला जवळ येऊ दिले नाही म्हणूनच ते प्रगत झाले. आमच्या-पेक्षा त्यांना देवाने अधिक बुद्धी दिली आहे अशातला प्रकार नाही. आणखी एक सांगतो. सदैव आशावादी राहणे हा एक जीवनाचा महामंत्र आहे. आशावादी मनुष्य नवी स्फूर्ती आणि नवी शक्ती हृदयात साठवूनच जगात वावरत असतो ! "



## बिनमठाचा संन्यासी

दीनदयाळ उपाध्याय म्हणजे खराखुरा दीनदयाळ. नाव आणि स्वभाव यांची उत्तम सांगड. देशातील जनतेवर किंबहुना अखिल मानवतेवर निकराचे प्रेम करणारा एक पुण्यपुरुष. देहाची पर्वा न करता लोककार्यांत निमग्न राहणारा एक त्यागी कार्यकर्ता. लग्न केले नाही म्हणून संसार नाही. स्वतःसाठी काही मिळवलेच नाही तर मग त्यागायचे तरी काय! म्हणून त्यागही नाही. एका ठिकाणी राहायला स्वतःचे असे एखादे घर? एखादी पर्णकुटी? रामा शिवागोविंदा! संन्याशालासुद्धा एखादा मठ असतो. पण हा संन्यासी मात्र बिनमठाचा. त्यामुळे सगळी घरे त्याचीच. रा. स्व. संघाचे सगळे कार्यकर्ते जणू त्यांचे नातलगच. कोणाच्याही घरी जावे, गोळाभर अन्न सेवावे आणि रात्रंदिवस काम करावे हा खाक्या. बुद्धी तल्लख. मन चिंतनशील. राष्ट्रीय जीवनाचे तत्त्वज्ञान पक्के.

असा हा दीनदयाळ! अनेक लोकोत्तर गुणांचा स्वामी. लहानपणा-

पासूनच लोकांना वाहिलेला आणि राष्ट्राला समर्पित !

दीनदयाळजींना अमेरिकेतल्या कुठल्यातरी विद्यापीठाकडून व्याख्याना-साठी निमंत्रण आले. हे जायला निघाले. संघस्वयंसेवकांना पराकोटीचा आनंद झाला. ते त्यांच्या भोवती जमले. विचारू लागले,

" पंडितजी ! तुम्हांला सर्वांत अधिक काय आवडतं ? आम्हाला सांगा. परदेशात जाताना आम्ही ते तुम्हांला देणार आहोत. तुम्ही फक्त नाव उच्चारा. मग त्याला किंमत कितीही पडू दे."

दीनदयाळ हसले. त्यांना वाटले, की आपल्या या मित्रांचे आपल्यावर किती प्रेम ! प्रेमाशिवाय त्यांच्याकडून त्यांना काही नको होते. ते म्हणाले,

" अरे, मला सर्व काही आहे. मला तुमच्या सदिच्छा तेवढ्या द्या. बस्स ! मला आणखी काही नको."

" तुम्ही नेहमीच असं बोलता. आम्हांला तुमच्यासाठी काही करूच देत नाही."

" बरं, बरं ! तुमची इच्छाच असली, तर मला मी सांगतो ती पुस्तकं घेऊन द्या."

आणि ही सर्व मंडळी विमानतळावर गेली. विमानात प्रवेश करण्याची सूचना झाली. दीनदयाळ विमानाच्या रोखाने जाऊ लागले. एवढ्यात एक स्वयंसेवक लगबगीने त्यांच्या जवळ गेला. एक लखोटा त्यांच्या खिशात कोंबून परतला. दीनदयाळांना वाटले, की त्या स्वयंसेवकाने अमेरिकेत कोणाला तरी देण्यासाठी एखादे पत्र दिले असेल.

विमानात बसल्यावर त्यांनी लखोटा बाहेर काढला. पाहतात तो त्याच्यावर त्यांचेच नाव ! वाटले, की काही तरी वेगळे आहे. त्यांनी लखोटा फोडला. आतून कसला कागद निघाला ? दहा हजारांचा चेक !

स्वारी अमेरिकेत आपली आबाळ करून घेईल म्हणून त्या प्रेमळ शिष्याने केलेली ती जाणीवपूर्वक तरतूद होती.

दीनदयाळ हसले. त्यांना कृतज्ञता वाटली. संघाचे स्वयंसेवक आपल्याला किती जपतात या अनुभवाने त्यांच्या आत्म्याला सुखस्पर्श झाला दीनदयाळ अमेरिकेला पोचले. तिथे व्याख्याने, चर्चा, संवाद सर्व काही यथासांग झाले. ते खूप हिंडले. पण त्यांनी तो चेक मोडला नाही. तो तसाच पडून राहिला.

दीनदयाळ स्वदेशी परत आले. पुन्हा आपल्या प्रचारकार्याला लागले. त्यांची भ्रमंती सुरू झाली. तसे त्यांच्या पायांना सदैव चाक बांधलेले असायचे. दिवसभर काम करायचे. थकावट नाही की रुकावट नाही. दुपारी कोणत्या तरी स्वयंसेवकाच्या घरी हाता तोंडाची गाठ घालायची. पुनः रात्र पडेपर्यंत काम. रात्रीच्या पोटपूजेसाठी चणे-कुरमुरे विकत घेऊन मुक्कामाच्या जागी यायचे. असे हे वर्षाचे बाराही महिने जणू अग्निहोत्र चालायचे.

असेच फिरता फिरता दीनदयाळ एका गावी आले. तिथे त्यांना आठवले, की आपल्या खिशात चेक कोंबणारा स्वयंसेवक याच गावात राहतो. त्यांनी त्याची गाठ घेतली. तो चेक परत करू लागले. स्वयंसेवकाने म्हटले,

"हे काय ! तुम्ही तो चेक वटवलाच नाही ?"

"अरे, गरजच भासली नाही. मला कुठे काहीच कमी पडले नाही. म्हणून हा चेक तसाच राहिला."

"मग आता वटवून घ्या."

"दहा हजार रुपये ! अरे बापरे ! एवढ्या रकमेचे मी करू काय ? तू आपला चेक परत घे."

"गुरुजी, हे नाही होणार."

"अरे, मग मोठा पेच आला की. आपण असं करू. हा चेक गुरुदक्षिणेसाठी देऊन टाकू."

आणि इतके दिवस खिशात राहिलेला तो कागदाचा तुकडा त्यागून ते

मुक्त झाले !

बाकी तसे ते मुक्तच होते. त्यांनी पैशाला कधीच किंमत दिली नाही. किंमत दिली ती अध्ययनाला. किंमत दिली ती चिंतनाला आणि किंमत दिली ती चिंतनात ठसले ते आचरणात आणायला.

दीनदयाळजींनी १९४२ साली अध्यापनाची पदवी प्राप्त केली होती. त्या दिवशी त्यांचे छात्रजीवन संपले. त्यांनी ठरविले की, आता कार्याला वाहून घ्यायचे. रा. स्व. संघाचा विस्तार करायचा. त्यासाठी ते लखीमपूर जिल्ह्यात गोला या गावी आले. त्यांनी तेथे संघाची शाखा सुरू केली. त्या गावी हायस्कूल होते. तिथल्या शिक्षकांशी व मुख्याध्यापकांशी त्यांचा परिचय झाला. एखादा शिक्षक रजेवर असला, की दीनदयाळ त्याच्या जागी उभे राहून विद्यार्थ्यांना शिकवू लागले. त्यांचे अध्यापन मुलांना खूप आवडायचे. कारण त्यात ज्ञानाची खोली असे आणि मनोरंजक विस्तारही असे. त्यामुळे त्या गावात त्यांचा खूप बोलबाला झाला.

त्या हायस्कूलचे मुख्याध्यापक थोड्याच दिवसांत निवृत्त व्हायचे होते. पुढे मुख्याध्यापक कोण ? संस्थेच्या प्रमुखांनी विचार केला की, दीनदयाळ-जींना मुख्याध्यापक म्हणून नेमून घ्यावे. त्यांनी दीनदयाळजींच्या पुढे तसा प्रस्ताव मांडला. मासिक रु. २५०/– वेतन देऊ असे म्हटले,

दीनदयाळजींना स्वतःला असे कुठे अडकवून घ्यायचेच नव्हते. ते म्हणाले,

" भाई, दोन धोतरे, दोन कुडती अन् एक वेळचं भोजन एवढीच माझी गरज आहे. हे सगळं तीस रुपयांत भागतं. मी तुमचे रु. २५०/– घेऊन करू काय ? तुम्हांला गरज लागेल तेव्हा मी तुमच्या सेवेला उपस्थित आहेच."

संघस्थानावर ते अनेकदा भाषणे करीत. ती नैतिक असत तितकीच कार्यप्रेरकही असत. त्या भाषणांना चिंतनाची एक सुरेख झालर असे. एके

दिवशी ते स्वयंसेवकांना उद्देशून बोलू लागले,

" मित्रहो, कोणत्याही कार्याला संघटित प्रयत्नांची गरज असते. एकट्या एकट्याने आपण काही करू शकत नाही. तुम्ही तुमच्या मनाकडे एकवार दृष्टी टाका. एकटे राहिल्याने काम तर होत नाहीच शिवाय मनाला सुखही लागत नाही. एकटे राहिल्याने भय वाटतं बरं का. एकटा माणूस उरी धास्तावतो. कुठून काय येईल अन् कुठून काय आदळेल! पण त्याच एकाने दुसऱ्याला बरोबर घेतले, की त्याला धीर येतो. त्याचं भय पळून जातं. तो म्हणतो, ' आपण दोघे आहो! आपल्याला कसली आली आहे भीती? दोन माणसं मातीची असली, तरी ती भय झुगारून देतात अशी म्हणच आहे.'

दोहोंच्या जागी तीन, चार, आठ, दहा, वीस एकत्र झाले की तो संघ बनतो. मग त्या संघात प्राण संचारतो. संघभावनेने प्रत्येकाला दुप्पट बळ येते. आत्मविश्वास द्विगुणित होतो. मग तो संघटित मानवसमूह कसल्याही आपत्तीला तोंड द्यायला कचरत नाही. मला एक प्रसंग आठवतो, तो सांगतो—

महायुद्धातल्या काळातली गोष्ट. त्या काळात आगगाडीला तुफान गर्दी व्हायची. कुठल्याही स्टेशनवर जा, गर्दी आहेच. त्या काळी आणखी एक गोष्ट चालू होती. गाडीला फार गर्दी आहे असे दिसले की, स्टेशनमास्तर तिकिट द्यायचेच बंद करी. मागच्या स्टेशनवरून त्याला तशी तार येत असे. मग तिकिट बंद. पण एखाद्याला प्रवासाची अत्यंत निकड असली तर तो तसाच विनातिकिट गाडीत घुसायचा.

मी गाडीतून प्रवास करीत असताना असाच एक माणूस माझ्या शेजारी दाटीवाटीने येऊन बसला. मी त्याच्याकडे बारकाईने पाहिले. बिचारा गरीब तर होताच शिवाय कसल्यातरी संकटात होता. त्याची घाबरलेली मुद्रा मला अस्वस्थ करू लागली. मी त्याला विचारले,

" काय गोष्ट आहे ? "

" बाबूजी, माझ्यापाशी तिकिट नाही. काय होईल माझं ? मला तर जायलाच हवं. पण आता भीती वाटते."

" भिण्याचे कारण नाही. खाली उतरलास की, तिकिट चेकर कुठे आहे तो बघ आणि तिकिटाचे होतील तितके पैसे त्याच्या हातावर ठेव."

त्याने बरे म्हटले, पण त्याची भीती मात्र गेली नाही. एवढ्यात दुसऱ्या एका प्रवाशाने त्याला म्हटले, " कशाला घाबरतोस यार ! मजजवळसुद्धा तिकिट नाही."

दुसरा असे बोलतो तोच शेजारचा तिसरा म्हणाला, " भाई, मी पण तुमच्यासारखाच ! " असे करता करता त्या डब्यात विनातिकिटाचे आठ-दहा लोक निघाले. ते पाहून मग त्या पहिल्याने निःश्वास सोडला. ' आपण एवढे लोक आहोत तेव्हा आता भीती नाही. जे काय व्हायचे ते सगळ्यांचे होईल ! '

तात्पर्य असे की, समानधर्मी लोक जेव्हा एकत्र येतात, एकत्र योजना आखतात आणि एकत्र काम करतात, तेव्हा काम तर होतेच शिवाय भयही पळून जाते. आणखी एक तुम्हांला सांगतो. आपले सुख-दुःख समाजाच्या सुख-दुःखाशी निगडित आहे. माणूस बाकीच्यांची पर्वा न करता एकट्या-नेच सुख घेऊ म्हणेल तर ते त्याच्या अंगी लागणार नाही. आपण सुखी व्हायला आपल्या भोवतीचा समाजही सुखी व्हावा लागतो.

श्री. दीनदयाळ उपाध्याय यांनी आयुष्यभर चिंतन करून एक नवा सिद्धान्त पुढे मांडला. एक नवे तत्त्वज्ञान निर्माण केले. त्याचे नाव आहे एकात्म मानववाद. या सिन्द्धान्ताचे स्वरूप विशद करताना ते म्हणतात—

" स्वतःच्या ध्येयसिद्धीसाठी सभोवतालच्या परिस्थितीला अनुकूल बन-विणे म्हणजे संस्कृती. मानवाच्या ध्येयमार्गात निसर्गाने प्रतिकूलता दाखविली, की तिला म्हणायचे विकृती. ही संस्कृती निसर्गाची अवहेलना करीत

नाही की त्याच्याकडे दुर्लक्ष करीत नाही. तर निसर्गातले अनुकूल भाव ती वाढवते आणि अन्य प्रवृत्तींची बाधा थोपवते.

रागावणे ही माणसाची प्रवृत्ती आहे. राग त्याच्या स्वभावातच असतो. जर अशा क्रोधाच्या आहारी जाऊन आपण काही व्यवस्था निर्माण केल्या तर त्या चालणार नाहीत. म्हणून आपल्या संस्कृतीत राग गिळायला सांगितले आहे. मनुष्य हा मनात आणले तर रागाचे दमन करू शकतो. क्रोध हा आपल्या जीवनाचा आधार होऊ शकत नाही; तर दमन हा आधार होऊ शकतो. अशा प्रकारचे जे नियम आपल्या संस्कृतीने बनविले आहेत ते नीतिशास्त्राचे नियम आहेत. त्यांनाच आपण धर्म म्हणतो.

आपल्या संस्कृतीने सृष्टीचाच नव्हे तर व्यक्तीचाही एकात्म किंवा संकलित विचार केला आहे. माणूस हा शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या चारांचा समुच्चय आहे. ही चारही तत्त्वे एकमेकांत घुलमिल झाली आहेत. आपण माणसाचा तुकड्या-तुकड्यांनी विचार करू शकत नाही किंवा तसे करणे युक्त नव्हे. सांप्रत पाश्चात्य देशांत ज्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यांचे कारण एकच आहे. ते लोक माणसाच्या एकेका भागाचा अलगपणे विचार करतात.

पाश्चात्यांतला आणि आमच्यांतला आणखी एक फरक आहे. ते लोक शरीराला साध्य मानतात, तर आपण साधन मानतो. शरीराच्या आवश्यक त्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत, हे आपणही मान्य केले आहे. पण त्या गरजा म्हणजेच सर्वस्व असे आम्ही मानले नाही. शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांच्या गरजा योग्य प्रमाणात पूर्ण करीत असतानाच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा अशी आपली दृष्टी असते. त्या दृष्टीने माणसाला जी कर्तव्ये असतात, त्यांनाच आपण धर्म, अर्थ, काम, मोक्ष अशी चार नावे दिली आहेत. त्यांनाच आपण चार पुरुषार्थ मानतो.

जेव्हा केव्हा एका मानवसमुदायाच्या पुढे समान कार्य, समान विचार

आणि समान आदर्श या गोष्टी असतात, आणि असा मानवसमुदाय जेव्हा एखाद्या विशिष्ट भूमीला मातेसमान मानतो, तेव्हाच तो मानवसमुदाय राष्ट्र या संज्ञेला पात्र होतो.

शरीरात जसा आत्मा तसाच राष्ट्राच्या शरीरातही एक आत्मा असतो. शास्त्रीय भाषेत त्याला चिती म्हणतात. चिती ही जन्मजात असते आणि ती ऐतिहासिक कारणांनी बनत असते. चिती हा एक मापनदंड आहे. किंवा तो एक निकष आहे. प्रत्येक वस्तू त्या निकषावर घासल्याने ती मान्य किंवा अमान्य ठरते. हाच राष्ट्राचा आत्मा होय. हा आत्मा राष्ट्रातल्या प्रत्येक श्रेष्ठ व्यक्तीच्या आचरणाच्या द्वारे प्रकट होतो.

ज्या एका शक्तीने राष्ट्राची धारणा होते तिला विराट म्हणतात. विराट ही कर्मशक्ती आहे. शक्ती चितीमुळे जागृत आणि संघटित होते. शरीरात जे प्राणांचे स्थान तेच राष्ट्रजीवनात विराटाचे आहे. विराटाच्या आधारावरच लोकतंत्र यशस्वी होऊ शकते. भाषा, जाती, व्यवसाय वगैरे भेद तर सगळ्याच ठिकाणी असतात. पण जिथे विराट जागा असतो तिथे संघर्ष होत नाही.

आम्हांला आपल्या राष्ट्राच्या विराटाला जागृत ठेवण्याचे काम करायचे आहे. आपल्या प्राचीन गौरवाला जो काही भावार्थ असेल तो घेऊन वर्तमानाचे यथार्थवादी संकलन करायचे आहे. या वर्तमानातूनच भविष्याची महत्त्वाकांक्षा जागृत करायची आहे. त्यासाठी आपण एकजुटीने काम करायला हवे."

असे होते दीनदयाळजी. होते म्हणण्याचे कारण ते आता या जगात नाहीत. एका सात्त्विक ऋषितुल्य पुत्राला भारत मुकला आहे. ११ फेब्रुवारी १९६८ च्या काळरात्री रेल्वेने प्रवास करीत असता कोण्या अज्ञात अधमाने त्यांची हत्या केली !



## गोवास्वातंत्र्याचा दीपस्तंभ

राम मनोहर लोहिया म्हणजे अखंड चैतन्याचे स्फुरण. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रखर किंबहुना प्रक्षोभक. बुद्धी म्हणजे लखलखती तलवार. अन्यायाच्या प्रतिकाराला सदैव सज्ज ! सर्व वृत्तीत राष्ट्रनिष्ठा अत्यंत प्रबळ !

लोहिया उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. पण तिथे मन रमेना म्हणून जर्मनीत पोचले. तिथे डॉक्टरेट मिळवून मायभूमीला परत आले. आले तेच देशभक्तीच्या मार्गाला लागले.

कलकत्त्याला त्यांचे वास्तव्य होते. तिथे ते एका वृत्तपत्राचे संपादन करीत. पैशाची सदा चणचण ! कधी अर्धपोटी, कधी एकभुक्त. आला दिवस कामात घालायचा. जीव तोडून काम करायचे. शरीरप्रकृतीकडे दुर्लक्ष !

लोहियांचा एक मित्र कलकत्त्यात होता. अगदी जिवश्च कंठश्च ! असे अनेक मित्र त्यांच्या प्रकांड पांडित्याला लोभावून त्यांच्या भोवती गोळा

झाले होते. पण हा मित्र विलक्षण होता. तो एक दिवस आला अन् म्हणाला" ' पुरे झाले हे जिवाचे हाल ! आता कुठे तरी नोकरी धंदा बघ. तोवर पुरतील एवढे पैसे मी तुला देतो.' असे म्हणून त्याने लोहियांच्या हातावर दोनशे रुपये ठेवले. पुनःपुन्हा व्यवसाय पाहण्याचा आग्रह करून तो मित्र निघून गेला.

पण दुसरा एक मित्र लोहियांच्या जोडीला होताच. तोही कफल्लकच. लोहियांसारखाच देशप्रेमाने भारलेला. लोहिया त्याला म्हणाले,

" गड्या, आजचा दिवस चैन करू."

दोघे मित्र बाहेर पडले. बाजारच्या रस्त्याला लागले. एका भोजनगृहात पोटभर जेवले. मग त्यांनी काही कपडे खरेदी केले. नव्या चपला घेतल्या. लोहियांनी राजकारण, अर्थकारण इत्यादी विषयांची काही नवी पुस्तके खरेदी केली. त्यासाठी त्यांनी सत्तर रुपये मोजले. मग दोघे मित्र पहाटे चार वाजेपर्यंत हुगळी नदीच्या काठाकाठाने तिथल्या मजुरांची परिस्थिती पाहात हिंडले. वाटेत भेटलेल्या भिकाऱ्यांच्या झोळीतही त्यांनी काही नाणी टाकली. खोलीवर परत आले तेव्हा लोहियांच्या खिशात दोनशेपैकी अवघे तीस रुपये शिल्लक राहिले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता लोहिया उठले ते एका स्त्रीच्या केविलवाण्या शब्दांनी. ती एका क्रांतिकारकाची पत्नी होती आणि काही तरी मदत मागण्यासाठी आली होती. खिशातले तीस रुपये तिच्या हातावर ठेवून लोहिया पुरते निष्कांचन झाले.

१९४२ च्या ' चले जाव ' चळवळीत लोहियांनी भूमिगत होऊन खूप काम केले आणि पकडले गेल्यावर यातनामय तुरुंगवासही भोगला. कैदेतून सुटल्यावर त्यांना वाटले, की काही दिवस कुठे तरी दूर जाऊन विश्रांती घ्यावी. आणि त्यासाठी १९४६ च्या जून महिन्यात लोहिया गोव्यात उतरले.

मडगावजवळच्या असोळणे या गावी डॉ. मिनेझिस नावाचे लोहियांचे

एक मित्र राहात होते. लोहिया त्यांच्याकडे उतरले. त्यांनी आजूबाजूला पाहिले. हिंदुस्थान ब्रिटिश सत्तेविरुद्ध पेटून उठला होता. ' करेंगे या मरेंगे ' ही भाषा बोलत होता. तो मनाने स्वतंत्र झालाच होता; पण ते स्वातंत्र्य व्यवहारात आणण्यासाठी साम्राज्यशाहीविरुद्ध अहिंसेच्या शस्त्राने लढत होता.

आणि गोवा ! तो जणू विझूनच गेला होता. थंड गोळा बनला होता. पोर्तुगीज सरकार मनमानी जुलूम करीत होते. पण सगळ्यांच्या माना खाली. प्रतिकाराची ताकद तर नव्हतीच; पण तशी इच्छाही मनातून मावळली होती. स्वातंत्र्य लांब राहिले; पण निदान नागरिक स्वातंत्र्य तरी ! पण त्याचाही पत्ता नव्हता. लोक अन्याय आणि अपमान केवळ मूकपणे सोशीत होते. मोठ्याने ' हाय ' म्हणण्याचीसुद्धा गोवेकरांना हिंमत नव्हती.

लोहियांची कीर्ती गोव्यातही पोचली होती. ते आले आहेत असे कळताच अनेक थरांतले अनेक लोक गुप्तपणे त्यांना भेटायला आले. उघडपणाची चोरी होती त्यांना. त्यांनी लोहियांना फिरंगी सरकारची दहशत आणि आपली कर्मकहाणी वेगवेगळ्या स्वरूपांत ऐकवली. लोहिया अस्वस्थ झाले. गोवा म्हणजे भारताचाच एक भाग. भारतात स्वातंत्र्य हातातोंडाशी आले असता गोव्यातल्या प्रजेला साधे मूलभूत नागरी स्वातंत्र्यही मिळू नये, ही शरमेची गोष्ट होती. राज्यकर्त्यांना आणि जनतेलाही ! .... त्यांनी मनाशी ठरवले, ' इथे चळवळ उभारलीच पाहिजे. पहिली मागणी नागरिक स्वातंत्र्याची.'

लोहियांचा हा विचार उचलून धरायला काही गोमंतकीय तरुण पुढे सरसावले. १८ जूनला मडगाव शहरात जाहीर सभा घ्यायचे ठरले. सरकारची परवानगी न घेता सत्याग्रही सभा ! पत्रके वाटली गेली. वेळ ठरली. दिवस ऐन पावसाळ्याचे. पण लोकांनी पावसाला जुमानले नाही. चहूबाजूंनी लोक मडगावच्या मैदानाकडे जमू लागले. सर्वांना उत्सुकता. लोहिया केव्हा येतात ? कुठून येतात ? '

आणि लोहिया आले. आपले मित्र डॉ. मिनेझिस यांच्यासह आले. लोकांनी त्यांना पाहिले. जनसंमर्दातून गर्जना उठली– ‘ लोहियांचा विजय असो ! .... गोवास्वातंत्र्याचा विजय असो ! ’

लोहिया व्यासपीठावर चढले. जमलेल्या जनसंमर्दाकडे पाहून त्यांना खूप हुरूप आला. ‘ आहे ! गोव्याच्या जनतेतही चैतन्याचा स्फुल्लिंग आहे ! ’ ते म्हणाले.

‘ माझ्या गोमतकीय मित्रांनो !—’

आणि पुढचे वाक्य पुरे होण्याच्या आतच एक पोलिस अधिकारी व्यासपीठावर धावून आला. भरलेले पिस्तुल रोखून आला. पण लोहिया अशा लोकांचे बारसे जेवलेले होते. आणि प्राणभय ही चीजच त्यांना माहीत नव्हती. त्यांनी पटकन त्या पोलिस अधिकाऱ्याचा पिस्तुलधारी हातच पकडला. चरित्रलेखिका इंदुमती केळकर लिहितात—

“ लोक चकित झाले. हे काय अद्भुत घडते आहे ! आयुष्यात त्यांनी ( गोव्याच्या लोकांनी ) पोर्तुगीज अधिकाऱ्यांचा अपमान केला नव्हता, की दुसऱ्या कोणी करताना पाहिला नव्हता आणि या इथे तर लोहियांनी पोर्तुगीज सत्ता अवमानिली होती. पोर्तुगीज सत्तेला शांतिपूर्ण रीत्या पहिला धक्का दिला होता.... अत्याचार आणि अन्यायाला जेथल्या तेथे अहिंसक प्रतिकाराने ठोकर मारण्याचा गोव्याच्या इतिहासातला हा पहिला क्षण ! कालप्रवाहात वाहणाऱ्या या भंगुर क्षणाने जनमानसांवर चिरंतन ठसा उमटवला. जनतेची हिंमत व साहस: वाढले. आणि सत्याग्रहाचा पहिला पाठ गिरवला गेला.”

लोहिया व मिनेझिस या दोघांनाही अटक झाली. पण त्यांचे भाषण छापलेले होते. त्या भाषणात त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती—

“ मी काही खास उद्देशाने इथे आलो नव्हतो. पण इथल्या साध्यासुध्या लोकांनी माझे मन आकृष्ट केले. इथे नागरिक स्वातंत्र्य नसल्याने लोकांची

अंतःकरणं दुःखित आहेत. पण मनातला क्रोध कसा व्यक्त करावा, हे त्यांना कळत नाही.... पोर्तुगीज सत्ता तर ब्रिटिश सत्ता नष्ट झाल्यावर नष्ट होईलच. पण येथील खरा प्रश्न सांस्कृतिक स्वरूपाचा आहे. पोर्तुगीजांनी गोव्याचं राष्ट्रीयत्वच खच्ची केलं आहे. गोव्याला साम्राज्यवादी संस्कृतीचं आश्रयस्थान बनवलं आहे. हे आश्रयस्थान नष्ट करण्याचं पहिलं पाऊल म्हणजे नागरिक स्वातंत्र्याचं हनन करणारे काळे कायदे नष्ट करणं....."

पोलिस लोहियांना घेऊन ठाण्यावर गेले. त्यांना चार भिंतींच्या आत त्यांनी कोंडले. ही वार्ता मडगाव आणि आसपासचा भाग यात वणव्यासारखी पसरली. लोक झुंडीच्या झुंडीने पोलिसठाण्याकडे येऊ लागले. 'लोहिया झिंदाबाद' गर्जू लागले. गर्दी वाढली. वाढतच राहिली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार सुरू केला. पण जमावाने त्यालाही दाद दिली नाही. लोकांना लोहियांचे दर्शन हवे होते. त्यासाठी लाठीच नव्हे; तर गोळीही खायला ते तयार होते. जमावामध्ये एक अनावर चैतन्य निर्माण झाले होते. त्याने भीती पार मारून टाकली होती.

मडगावच्या पोलिसप्रमुखाने या परिस्थितीचे गांभीर्य ओळखले. तो लोहियांना म्हणाला,

"तुम्ही बाहेर येऊन लोकांना शांत करा."

लोहिया बाहेर आले. जनसंमर्दापुढे उभे राहिले. लोकांनी त्यांचा गगनभेदी जयजयकार केला. लोहियांनी लोकांच्या पुढे छोटेसे भाषण केले. 'हिंसेचा अवलंब करू नका अन् प्रज्वलित झालेली स्वातंत्र्याची मशाल खाली ठेवू नका. नागरी स्वातंत्र्य हा माणसाचा मूलभूत हक्क आहे. तो तुम्हांला मिळालाच पाहिजे....'

जमावाने लोहियांची आज्ञा ऐकली. लोक पांगले. पण अंतरात स्वातंत्र्याची स्फूर्ती घेऊन पांगले. दुसऱ्या दिवसापासून प्रभात फेऱ्या सुरू झाल्या. मिरवणुका निघू लागल्या. सत्याग्रह होऊ लागले. हरताळ सुरू

झाले. सभा भरू लागल्या. सगळे गोव्याचे वातावरण चैतन्यमय झाले.

तशात एक दिवस हूल उठली, की सत्याग्रही मोठ्या संख्येने मडगावच्या तुरुंगावर धाड घालणार आणि लोहियांना सोडवून नेणार ! सरकार घाबरले. त्याने लोहियांना तिथून पणजीला हालवायचे ठरवले. लोकांना तीही कुणकुण लागली. लोक जागोजाग रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून लोहियांचा जयजयकार करू लागले. लोहियांना दोन दिवस पणजीत ठेवून पोर्तुगीज सरकारने त्यांची मुक्तता केली. त्यांना पोर्तुगीज हद्दीबाहेर नेऊन सोडले. पण जाता जाता लोहियांनी पोर्तुगीज सरकारला बजावले.

" आजपासून तीन महिन्यांच्या आत गोव्याला नागरी स्वातंत्र्य मिळाले नाही, तर फिरून मी गोव्यात येईन अन् चळवळ उभारीन."

पोर्तुगीज असल्या धमकीला भीक घालणार होते थोडेच. त्यांनी असे दमनचक्र चालवले की दोन महिन्यात चळवळीचे कंबरडेच मोडले. पण लोहियांनी आपले वचन खरे केले. ते बेळगावला गोव्याच्या गाडीत बसले. जाहीरपणे निघाले. पोर्तुगीजांना ही बातमी ताबडतोब कळली. कुळे स्टेशनवर पोलिस गाडीत चढले आणि त्यांनी लोहियांना बंदिवान केले. त्यांची रवानगी आग्वादच्या किल्ल्यात झाली. २९ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर एवढ्या मुदतीत लोहिया आग्वाद येथे बंदिस्त राहिले आणि फिरून सुटले. पोर्तुगीज सरकार या वेळी त्यांना बरीच वर्षे डांबून ठेवायच्या तयारीत होते. पण म. गांधींनी लोहियांना उचलून धरले. त्यांना वाटले की लोहिया नव्हेत, तर भारताचा आत्मा पोर्तुगीजांच्या कैदेत आहे.

गोवा गव्हर्नर जनरलने महात्माजींना एक पत्र लिहून आपल्या अकलेचे तारे तोडले. ' तुम्ही आमच्या राज्यात हस्तक्षेप करू नका. तुम्ही वकील असलात तर मी न्यायाधीश आहे. तुमच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. आम्ही गोव्यात आहो, ते समता आणि बंधुभाव यांच्या प्रचारासाठी....'

गव्हर्नर जनरलच्या या उद्दाम पत्राला महात्माजींनी पुढीलप्रमाणे उत्तर लिहिले—

" प्रिय मित्र, पत्रोत्तराबद्दल धन्यवाद ! मी मोझांबिक, डेला गोवा आणि इन्न्यां बानी येथे जाऊन आल्याचे आपणांस विदित असेलच. मला तिथे लोकहितैषी सरकार दिसले नाही. सरकारने हिंदी व पोर्तुगीज आणि आफ्रिकी व आपण स्वतः यांच्यामध्ये केलेला फरक पाहून आश्चर्य वाटते. आपला नागरी स्वातंत्र्याचा दावा गोव्यातील आपल्या वसाहतींचा इतिहास देखील सिद्ध करीत नाही. गोव्यातील भारतीयांची ही दुरावस्था आपल्या दडपशाहीचा पुरावा आहे. आपल्या सर्व विधानांचे खंडन तिथे घडणाऱ्या घटनाच करीत आहेत. डॉ. त्रिस्तांव ब्रागांझांना आठ वर्षांची दिली गेलेली शिक्षा ही एकच गोष्ट नागरिक स्वातंत्र्याचा लोप झाला आहे, हे सिद्ध करणारी आहे. लोहियांचे राजकारण माझ्या राजकारणापेक्षा वेगळे असण्याची शक्यता आहे. पण त्यांनी गोव्याच्या नेमक्या कलंकमय जागी अचूकपणे बोट ठेवले आहे. मी त्यांची याबद्दल प्रशंसा करतो...... लोहियांनी गोव्यात पेटविलेली मशाल गोवावासी विझू देतील तर त्यात धोका आहे......"

आज गोवा स्वतंत्र झाला आहे. तो लोकशाही राजवट उपभोगीत आहे. पोर्तुगीज गोव्यातून निघून गेले आहेत. नव्हे त्यांना भारताच्या सशस्त्र सेनादलांनी सागरपार घालवले आहे. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी प्रज्वलित केलेल्या स्वातंत्र्यज्योतीचा हा प्रकाश आहे. गोव्यातली जनता लोहियांविषयी कृतज्ञ आहे.



## संपूर्ण क्रांतीचा उद्‌गार

१९७१ सालचा ऑक्टोबर महिना. लोकनायक जयप्रकाश नारायण आपली सार्वजनिक कामे काही दिवस बंद ठेवून पाटणा येथे आपल्या घरी विसावले होते. अशात एके दिवशी एक अनोळखी गृहस्थ त्यांच्यापुढे येऊन उभा राहिला. गृहस्थ उंचापुरा, धडधाकट आणि रुबाबदार होता. त्याचे कपडेही भारी किंमतीचे रुबाबाला साजेसेच होते. त्याने दाढीही वाढवली होती. एकूण त्याचे व्यक्तिमत्त्व सामान्य माणसाला धाक उत्पन्न करणारेच होते. त्याने विचारले,

" जयप्रकाशजी आपणच का ? "

" होय. तुम्ही कोण ? " जयप्रकाशांनी विचारले.

" माझं नाव रामासिंग. चंबळच्या जंगलात मी ठेकेदारीचा धंदा करतो. मी आपल्याला एक निरोप घेऊन आलो आहे."

" कोणाचा निरोप ? "

" चंबळ खोऱ्यातील डाकूंचा. ते लोक तुमच्यापुढे शरणागती पत्करू इच्छितात. त्यांना आपल्या डाकूगिरीचा आता पश्चात्ताप होतो आहे."

" चांगली गोष्ट आहे. पण तुम्ही माझ्याकडे का आलात ? तुम्ही आचार्य विनोबांच्याकडे चला. विनोबांनी हे प्रयोग केले आहेत. काही वर्षांपूर्वी विनोबांच्या पदयात्रेत मध्य प्रदेशातल्या भींड, मुरेना या जिल्ह्यांतले बरेचसे डाकू त्यांना शरण आले होते. तेव्हा तुम्ही त्यांच्याकडे चला. हे काम मला अंगावर घ्यायचं नाही."

असे बोलून जयप्रकाश आपल्या बैठकीवरून उठले आणि घरात जाऊ लागले. पण ठेकेदाराने पुढे होऊन त्यांना अडविले.

" बाबूजी, माझं म्हणणं तरी ऐकून घ्या. हे काम निकडीचं आहे. विनोबांच्या इतकेच आपल्या शब्दालाही वजन आहे. आपण हा प्रश्न हाती घेतला तर चंबळखोऱ्यावर फार उपकार होतील. चंबळखोऱ्यातील सर्वच्या सर्व डाकू आपल्यापुढे शस्त्रत्याग करायला सिद्ध आहेत. डाकूगिरी सोडून त्यांना सामान्य माणसाचं जीवन जगायचं आहे. आपण मला नकार देऊ नका. आपण त्या डाकूंना अभय दिलंत तर चंबळखोरं शांत होईल, निर्भय होईल."

जयप्रकाशजी थबकून उभे राहिले. पण त्यांच्या दृष्टीत आर्द्रता नव्हती. शब्दांत आश्वासन नव्हते. आलेल्या माणसाला झटकून टाकावे या आविर्भावात ते म्हणाले,

" माझा तुमच्यावर विश्वास नाही. माझी प्रकृतीही ठीक नाही. अंगावर घेतलेल्या जबाबदाऱ्या मी हळूहळू कमी करतो आहे. अशा स्थितीत हे नवं काम मी अंगावर घेऊ इच्छित नाही. तुम्ही सरळ विनोबांच्याकडे चला."

" मी विनोबांकडे गेलो होतो. पण त्यांनी आपल्याकडे पाठविले."

" ते काहीही असो. मला फुरसत नाही."

आणि एकाएकी त्या गृहस्थाने जयप्रकाशांच्या पुढे आपले खरे स्वरूप प्रकट केले.

" बाबूजी, मी रामसिंग ठेकेदार नाही. मीही एक डाकू आहे. ज्याचं नुसतं नाव ऐकताच चंबळखोऱ्यातील माणसं चळचळा कापतात तो माधोसिंग डाकू तो मीच."

ते नाव ऐकताच जयप्रकाशजी विस्मित झाले. एका क्रूरकर्म्या डाकूचे हे धाडस! ते माधोसिंगाकडे काही क्षण एकटक पाहताच राहिले. मग म्हणाले,

" माधोसिंग, तुम्हांला पकडण्यासाठी सरकारने दीड लाख रुपयांचं बक्षीस लावले आहे; माहीत आहे ना? राजरोस इथे येण्यात केवढा धोका पत्करला आहे तुम्ही!"

" धोका इतरांच्यापासून असेल. आपल्यापासून नाही. आपली कीर्ती आम्ही ऐकली आहे. आपल्यावर आमचा पूर्ण भरंवसा आहे. म्हणून तर हे जिवावरचे साहस करून आपल्या पायांपाशी आलो आहे."

माधोसिंगाने ज्या पद्धतीने आपले निजरूप प्रकट केले आणि त्याने जो विश्वास व्यक्त केला, त्याने जयप्रकाशजींचे मन जिंकले. त्यांनी त्याला बसवून घेतले. थोडा वेळ विचार केला आणि मग प्रश्न केला,

" चंबळचे डाकू शरण येतात, ही चांगली गोष्ट आहे. पण त्यांच्या अटी काय आहेत ते सांगा."

" अट एकच आहे. आम्ही वाटेल तेवढी सजा भोगू, पण आम्हांला फाशीची शिक्षा होता कामा नये. आम्हांला जगायचे आहे. शिक्षा भोगून झाल्यावर पुन्हा आम्हांला कुटुंबपरिवारात जायचे आहे. सुखाने संसार करायचा आहे."

जयप्रकाशांना वाटले, की अट वाजवी आहे. पण या गोष्टी तातडीने होणार नव्हत्या. त्या संदर्भात भारत सरकारशी वाटाघाटी करायला हव्या

होत्या. संबंधित राज्यसरकारांचेही मन वळवायला हवे होते. त्यांचे जे सर्वोदयी सहकारी होते त्यांच्याशीही विचारविनिमय करावा लागणार होता. पण त्यापूर्वी माधोसिंगाचे संरक्षण करावे लागणार होते. काही तरी आश्वासन देऊन त्याला परत पाठविणे योग्य नव्हते. तो आपल्या चंबळ-खोऱ्यात पोचण्यापूर्वी वाटेतच पकडला गेल्यास त्याची धडगत नव्हती. म्हणून त्यांनी धोका पत्करून माधोसिंगाला आपल्या सोखोदेवरा आश्रमात पाठवून दिले. आणि एवढे करून जयप्रकाश भारत सरकारशी पत्रव्यवहार करण्याच्या या नव्या उद्योगाला लागले. हे नवे आव्हान आणि आवाहनही त्यांनी धैर्याने स्वीकारले.

सरकारशी पत्रव्यवहार सुरू असतानाच त्यांनी भाई महावीरसिंग आणि हेमदेव शर्मा या आपल्या सहकाऱ्यांना तार करून बोलावून घेतले. हे दोघे चंबळघाटी शांतिसेनेचे कार्यकर्ते होते. ते लगोलग आले. जय-प्रकाशांनी माधोसिंगाशी त्यांची ओळख करून दिली. त्या तिघांनी मिळून मसलत सुरू केली. शरणागतीचा समारंभ व्हायचा तर त्या आधी चंबळखोऱ्यात जाऊन खुद्द डाकूंशी संपर्क साधायला हवा होता. कामाची संघटना बांधायला हवी होती. डाकूंचे मनोगत व्यक्तिशः समजून घ्यायला हवे होते.

जयप्रकाशांच्या मित्रांनी ही सर्व कामे टप्प्याटप्प्याने पुरी केली. नंतर जयप्रकाशजींनी डाकूंना उद्देशून पुढील आवाहन प्रसिद्ध केले. त्यांचे चारित्रकार बा. न राजहंस यांनी हे आवाहन पुढील शब्दांत दिले आहे :

" सध्या आपला देश अतिशय नाजूक अवस्थेतून चालला आहे.... अशा वेळी चंबळघाटीतील बागीबंधूंना अशी विनंती आहे, की त्यांनी आपला चुकीचा रस्ता सोडावा व आपल्या देशाशी सहकार्य करावे या कामाबाबत मी केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. कृष्णचंद्र पंत, तसेच मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश व राजस्थानचे मुख्यमंत्री यांच्याशी संपर्क करीत आहे आणि

त्यांची या कामामध्ये पूर्ण सहानुभूती आहे. बागीभाईंना माझी अशी विनंती आहे, की त्यांनी आपल्या कारवाया सोडून द्याव्या आणि हिमतीने समाजासमोर आत्मसमर्पण करावे..."

मोहरसिंग हा जबरदस्त डाकू प्रथम तयार झाला. त्यानंतर मग एका-मागून एक असे बरेच. मग केंद्रीय गृहखात्याने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश व राजस्थान या तिन्ही राज्यांच्या पोलिसप्रमुखांची जयप्रकाशांबरोबर बैठक घडवून आणली. सविस्तर चर्चा झाली. पुढच्या काही दिवसांत हा डाकूंच्या आत्मसमर्पणाचा कार्यक्रम जौरा येथील गांधी आश्रमात पार पाडायचे ठरवले. हा समारंभ जाहीर स्वरूपाचा होऊ नये अशी सरकारची इच्छा होती. पण लोकांना ती मान्य झाली नाही. जौरा आश्रमातला तो सोहळा पाहण्यासाठी हजारो माणसे तिथे जमली. एका मोठ्या दालनात जयप्रकाश आणि त्यांच्या धर्मपत्नी प्रभावतीदेवी अशी दोघे येऊन बसली. दुसऱ्या क्षणी एक मध्यम उंचीचा रुबाबदार पण हसतमुख बंदुकधारी पुढे आला. मोहरसिंग तो हाच. आत्मसमर्पणाचा पहिला मान त्याने मिळवला. त्याने जयप्रकाश-जींच्या चरणी मस्तक ठेंगणे केले. जयप्रकाशांनी त्याला विचारले,

"बोला, तुम्हांला काय सांगायचे आहे?"

त्यावर मोहरसिंग भरल्या गळ्याने म्हणाला.

"मला काही सांगायचे नाही. काही विचारायचे नाही. मी आपल्या समोर हजर झालो आहे. मस्तक आपल्या चरणांवर ठेवले आहे. वाटल्यास तुम्ही ते फासावर लटकावा. माझी तीही अट नाही."

जमलेल्या सर्व सभेने मोहरसिंगाचे ते आत्मसमर्पणाचे शब्द ऐकले. सभा चित्रासारखी तटस्थ झाली. जे घडत होते ते विस्मयजनक होते. भूतकाळात असे कधी घडले नव्हते. हा जयप्रकाशजींच्या शुद्ध चारित्र्याचा आणि त्यांच्या हृदयातल्या माणुसकीच्या गहिवराचा विजय होता.

संत एकनाथांनी एका चोराला चोरीमारीपासून परावृत्त केले तर संत

अंधार. कोठडीत असताना दिवस उगवायचा आणि कोठडीत असतानाच तो मावळायचा. खरे म्हणजे एका महान देशभक्तावर, लोकशाहीवर दृढ विश्वास ठेवणाऱ्या, एका महान सर्वोदयी संतावर हा एक महान आघात होता. एखादा सामान्य माणूस त्या आघाताने निपचित पडला असता, जीवन्मृत झाला असता.

पण ते होते जयप्रकाश ! देहाने खंगले, रोगाने जर्जर झाले, पण मनाने, आत्म्याने अभंग राहिले. त्यांच्या मनात द्वेष नव्हता, सूड नव्हता. शाप नव्हता. देशाला समर्पण झालेल्या सत्पुरुषाच्या मनात हे विचार संभवतीलच कसे ! त्यांनी आत्मचिंतन सुरू केले, आपले कुठे चुकले याचा विचार सुरू केला. पुढे काय करायचे, या देशाचे भले कसे व्हायचे याचीच भवति न भवति अंतरात सुरू केली. या देशात क्रांती व्हायला हवी आणि ती तरुण विद्यार्थ्यांनी करायला हवी, इथवर त्यांचे विचार पोचले. हिंसा आणि रक्तपात यांतून घडवली जाणारी क्रांती नव्हे; तर जनतेच्या परिवर्तनातून निर्माण होणारी अहिंसक क्रांती ! तीही संपूर्ण. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, एवढेच नव्हे तर संपूर्ण अंतर्बाह्य जीवनाचीच क्रांती. इथे सर्व देशबांधव समान भूमिकेवर येतील. भारतीय उत्कर्षाच्या समान ध्येयाने कार्योन्मुख होतील. अशा प्रकारची सर्वसमावेशक आणि सर्वांचे उन्नयन करणारी क्रांती ! स्वार्थ, लोभ, द्वेष, भ्रष्टाचार, यांचा संपर्क नसलेली क्रांती !

त्यांनी आपल्या तुरुंगवासात दिनलेखा लिहिली आहे. ते एक प्रकट चिंतनच आहे. त्या चिंतनातूनच त्यांना ऑगस्टच्या सात तारखेला जो एक उत्स्फूर्त साक्षात्कार झाला, तो त्यांनी पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केला आहे—

**संपूर्ण क्रांति अब नारा है**
**भावी इतिहास हमारा है ।**

जयप्रकाशांनी रक्ताला तहानलेल्या आणि सूडबुद्धीच्या कित्येक डाकूंना आत्मसमर्पणाची प्रेरणा दिली.

जे शस्त्रबळाला साधले नाही, ते जयप्रकाशांच्या आत्मबळाने साधून दाखवले.

पण मोहरसिंगाच्या काही अटी नसल्या तरी बाकीच्या डाकूंच्या होत्या. त्यांचे निवेदन नारायण पंडित याने वाचून दाखविले. तो म्हणाला,

"डाकूंना बेड्या घालू नयेत. त्यांच्या परिवाराचे संरक्षण व्हावं. सरकारने गावात दिलेल्या बंदुका परत घ्याव्या. डाकूंच्या कुटुंबियांविरुद्ध पोलिसांनी जी नोंदपत्रे तयार केलीत, ती रद्द व्हावी आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकाही डाकूला फाशीची शिक्षा होऊ नये."

हे निवेदन ऐकल्यावर जयप्रकाश बोलायला उठले. ते म्हणाले.

"डाकूंनी सुचविलेल्या सर्व शर्ती सरकारने मान्य केल्या आहेत. अर्थात डाकूंना तुरुंगाची शिस्त पाळावीच लागेल. तुरुंगात तुम्हा मंडळींची वर्तणूक कशी काय असेल त्यावर तुम्हांला लौकर सोडायचे किंवा सोडायचे नाही हे सरकारला ठरवता येईल. तुम्हांला फाशी होणार नाही असे सरकारने मला अभिवचन दिले आहे. सरकारने ते मोडले, तुमची कुणाची फसवणूक केली आणि कोणाला फाशी द्यायचं ठरवलं तर मीही त्याच्या-बरोबर प्राणांतिक उपोषण करून मरून जाईन. तुमचे आणि माझे प्राण सारखेच आहेत."

जयप्रकाशांचे हे शब्द म्हणजे जणू एका करुणामय प्रेषिताचे शब्द होते. ते ऐकताना सर्वांची मने थरारली आणि नकळत डोळे पाणावले!

१९७५ साली देशात आणीबाणी लागू झाल्यानंतर ताबडतोब जय-प्रकाशजींना पकडण्यात आले. त्यांना तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले. आरोप नाही, खटला नाही, आत्मसंरक्षणाचे कोणतेही साधन नाही, दाद मागायला कुठे जागा नाही. सगळा नियतीवर भरंवसा. दृष्टीपुढे

अंधार. कोठडीत असताना दिवस उगवायचा आणि कोठडीत असतानाच तो मावळायचा. खरे म्हणजे एका महान देशभक्तावर, लोकशाहीवर दृढ विश्वास ठेवणाऱ्या, एका महान सर्वोदयी संतावर हा एक महान आघात होता. एखादा सामान्य माणूस त्या आघाताने निपचित पडला असता, जीवन्मृत झाला असता.

पण ते होते जयप्रकाश! देहाने खंगले, रोगाने जर्जर झाले, पण मनाने, आत्म्याने अभंग राहिले. त्यांच्या मनात द्वेष नव्हता, सूड नव्हता. शाप नव्हता. देशाला समर्पण झालेल्या सत्पुरुषाच्या मनात हे विचार संभवतीलच कसे! त्यांनी आत्मचिंतन सुरू केले, आपले कुठे चुकले याचा विचार सुरू केला. पुढे काय करायचे, या देशाचे भले कसे व्हायचे याचीच भवति न भवति अंतरात सुरू केली. या देशात क्रांती व्हायला हवी आणि ती तरुण विद्यार्थ्यांनी करायला हवी, इथवर त्यांचे विचार पोचले. हिंसा आणि रक्तपात यांतून घडवली जाणारी क्रांती नव्हे; तर जनतेच्या परिवर्तनातून निर्माण होणारी अहिंसक क्रांती! तीही संपूर्ण. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, एवढेच नव्हे तर संपूर्ण अंतर्बाह्य जीवनाचीच क्रांती. इथे सर्व देशबांधव समान भूमिकेवर येतील. भारतीय उत्कर्षाच्या समान ध्येयाने कार्योन्मुख होतील. अशा प्रकारची सर्वसमावेशक आणि सर्वांचे उन्नयन करणारी क्रांती! स्वार्थ, लोभ, द्वेष, भ्रष्टाचार, यांचा संपर्क नसलेली क्रांती!

त्यांनी आपल्या तुरुंगवासात दिनलेखा लिहिली आहे. ते एक प्रकट चिंतनच आहे. त्या चिंतनातूनच त्यांना ऑगस्टच्या सात तारखेला जो एक उत्स्फूर्त साक्षात्कार झाला, तो त्यांनी पुढीलप्रमाणे शब्दबद्ध केला आहे——

**संपूर्ण क्रांति अब नारा है**
**भावी इतिहास हमारा है।**

' हे सारं इतिहासात आता काय एक चेष्टेचा विषय म्हणूनच राहणार आहे ? सगळे ' जी हुजूर ' भित्रे आणि डरपोक, आम्हांला तर नक्कीच हसत असतील. ' चालले होते मारे आकाशातल्या चांदण्या वेचायला, आता पडले जाऊन नरकात ! ' पण ह्या जगात जर कुणी काही केले असेल तर ते चांदण्या वेचणाऱ्यांनीच केले आहे. मग त्यासाठी भले त्यांना प्राणाचे मोल का द्यावे लागले असेना !

संपूर्ण क्रांतीच्या जागी आज तर संपूर्ण प्रतिक्रांतीचे ढग पसरले आहेत. वेळ अशी आहे की जेव्हा घुबड आणि गिधाडं अत्यंत प्रसन्न आहेत. चारी दिशांना हुआं हुआं आणि हू हू चे घुत्कार ऐकू येताहेत. पण कालचक्र तर फिरतच असतं. रात्र कितीही का अंधेरी असेना, पहाट ही फुटणारच !

पण मग पहाट काय आपोआप फुटणार ! आणि आम्ही सारे लोक हात बांधून तिची प्रतीक्षा करीत राहणार ? नाही. सामाजिक क्रांती जर फक्त नैसर्गिक क्रांतीच्या मागं मागं जाणं एवढंच करीत असती तर मानवाच्या पुरुषार्थासाठी काही जागाच शिल्लक राहिली नसती. तर मग काय करायला हवंय ? याचं उत्तर हे आहे की जे ही घोषणा करत होते आणि गीतं गात होते त्यांना बलिदान करावं लागेल आणि त्यांच्यांतला जो अग्रेसर होता त्याला पहिला बळी व्हावं लागेल. संशय फिटले आहेत. निश्चय होऊन गेला आहे.

काल रात्री माता भगवतीची प्रार्थना करते वेळी या घोर अंधारातून बाहेर पडण्यासाठी दिशा दाखवण्याचा आदेश देण्याची याचना केली होती, तो आज पहाटे मिळाला. आता मन स्थिर आहे, शांत आहे.

**भारतमातेचा विजय असो !**

BVBK-0400041

४१